
MAHARASHTRA MANDAL CHICAGO

# रचना

महाराष्ट्र मंडळ शिकागो



तू खरी की तू परी
तुझी रूपे
कितीतरी
स्वार हो युगावरी
ने गुढीस अंबरी!

गुढीपाडवा
विशेषांक २०२६


# -अनुक्रमणिका-


| | | |
|---|---|---|
| • संपादकीय | | १२ |
| • अध्यक्षीय | | १३ |
| • ‘रचना’ चमू | | १५ |
| • MMC पदाधिकारी २०२६ : परिचय आणि फोटो | | १६ |
| • शिकगो मराठी शाळा कर्यकारिणी | | २८ |
| **लेख** | | |
| • गुढीपाडवा | प्रांजल चौगुले | २९ |
| • आग्र्याहून सुटका | विनय भालेराव | ३0 |
| • गेला विनोद कुणीकडे | विक्रांत वैद्य | ३४ |
| • टेमगिरवाडी -आगळीवेगळी मराठी शाळा | माधव गोगावले | ३६ |
| • तीन क्ष - लक्ष, दक्ष आणि मोक्ष! | रत्नांगी मालपेकर | ४१ |
| • मुंबई लोकल ९.१९ : गर्दीत घडलेली आयुष्यकथा | वृषाली अणावकर | ४५ |
| • A Pilgrimage from Chappan To Sarafa-Indore | Rajeev Gokhle | ४८ |
| • लगीनघाई | विनय भालेराव | ५0 |
| • अजरामर | सुलक्षणा कुलकर्णी | ५२ |
| • माझा सखा | वासवदत्ता पटवर्धन | ५५ |
| **कविता** | | |
| • कविता | सुजाता महाजन | ५८ |
| • माया | श्रद्धा भट | ५९ |
| • कविता | शिल्पा देशपांडे | ६0 |
| • जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं... | स्वप्ना कानविंदे | ६१ |
| • पुस्तक माझा मित्र | अलका धाराशिवकर | ६२ |
| • Poem | Sanika Surve | ६३ |
| • When the Sky Turned Gray | Vedika Deshpande | ६४ |

| | | |
|---|---|---|
| **व्यंगचित्र** | श्रीकान्त कोरान्ने | ६६ |
| **सदरे** | | |
| **शब्दकोडे** | अभिजित रायरीकर | ६७ |
| **गंमत शब्दांची**<br>पांढरपेशा | डॉ. द.दि. पुंडे | ६९ |
| **बोधप्रश्नोत्तरी** | प. पू. श्री. मंगेशदादा फडके | ७० |
| **तन- मनाचा भोवरा**<br>अटेन्शन डेफिसिट हायपर ॲक्टिव्हिटी डिसऑर्डर | रश्मी वडवळकर | ७३ |
| **खवय्येगिरी**<br>• कॉर्न चाट | मिताली खासबाग | ७६ |
| **शब्दकोडे उत्तर** | | ७७ |
| | | |
| **क्षणचित्रे :** | | |
| • गुढीपाडवा २०२६ | | ७८-८० |
| • इतर उपक्रम | | ८१ |
| • मराठी शाळा कामगिरी | | ८२-८३ |
| **MMC झूम कट्टे आणि त्यांचे आयोजक** | | ८४-१०१ |
| • MMC झूम कट्टयांच्या कार्यक्रमपत्रिका | | १०२-१११ |


- **मुखपृष्ठ कविता :शिल्पा देशपांडे**

- या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच, असे नाही.


Akshit Creations
by Swapna Gundawar
AC
AKSHIT CREATIONS
YEOLA PAITHANIES
Home of Original Yeola Paithani Sarees
PAITHANI SAREES ▪ LEHENGAS ▪ DUPATTA
▪ JACKETS ▪ IRKAL ▪ GADHWAAL ▪ PATOLA
▪ KANJIVARAM SAREES ▪ NARAYANPET SAREES
PURE SILK, SOFT SILK, HANDMADE, MACHINE MADE SAREES
Follow us on
#akshitcreations 224-286-2444

## About Us

At Cruz Investments & Wealth Management, we believe everyone should be able to live the retirement they've always wanted. Our team of professionals can help you create a well-thought-out strategy, using a variety of investments and insurance products and services, designed to help you address your financial needs and concerns.

## Why Choose Us

With our custom "Cruz SMART Plan" you will get a 360-degree review of your financial picture, including how your retirement assets are integrated and work together. From there, we'll craft a strategy to help you get to your goals.

# CRUZ
Investments &
Wealth Management

"Cruzing into Retirement"

**S** Sources of Income

**M** Medical & Healthcare

**A** Advanced Financial Planning

**R** Risk Management

**T** Tax Efficient Strategies

ReyCruz.com | 630-897-0333

"Investment advisory services offered through Cruz Investments & Wealth Management, an Illinois State Registered Representative Investment Advisor. Securities offered only by duly registered individuals through Madison Avenue Securities, LLC (MAS), Member FINRA/SIPC. Cruz Tax Advisory, LLC and Cruz Investments & Wealth Management are not affiliated with MAS. Cruz Tax Advisory offers tax advice on qualified plans. Consult your tax advisor on your specific situation."


A TATA PRODUCT
www.tanishq.com
TANISHQ
Celebrate Akshaya Tritiya with
NAVYA
Prosperity that's handcrafted
UP TO 25% OFF*
on Diamond value and on making charges of Gold Jewelry
0% DEDUCTION* ON EXCHANGE
of old gold above 9KT
PAY 25% ADVANCE
now to book and get the best gold rate at purchase
April 3rd - April 20th
4300 East New York Street, Opp. Fox Valley Mall, Aurora


Braulio Valladares
Insurance
State Farm
Insurance
Auto · Home · Life
Health · Business
Auto
Home
Life
Health
Business
847-672-9004
www.myagentbraulio.com
State Farm
We help families understand their assets, liabilities, and risks.
The right decisions today prevent money problems tomorrow
Money fixes money problems.


ROLL THE DICE
GET YOUR PRICE*
APPLICABLE ON
22K GOLD
AND 18K DIAMOND
JEWELRY
GUARANTEED 40% OFF*
DIAMOND JEWELRY.
PLUS EXTRA SAVINGS WITH YOUR
1 LUCKY ROLL.
OFFER VALID:
MARCH 17 – APRIL 19, 2026
*T&C APPLY
PNG
JEWELERS
Happy
Ugadi | Gudhi Padwa | Navreh
VISIT: 791 E EL CAMINO REAL, SUNNYVALE, CA 94087. CALL: 408 245 6764
WWW.PNGJEWELERS.COM | FOR VIRTUAL SHOPPING, CALL 650 476 3927


NRI
SPECIAL
OFFER
वारसा
PUSHPAM®
P52800080169
Timeless Investment
Plots for sale Starts @ ₹30 lakhs*
Only 85 Sea-View NA Plots
5 mins from Kolthare Beach
Fully Developed Infrastructure
Scenic Coastal Location
High Land Appreciation
Clear Title & Documentation
Easy Road Connectivity
Ready for Construction
Legacy Investment for Generations
Signature Features at Varsa
Dapoli
Dapoli, near Kolthare Beach
By Road Distance
Mumbai to Dapoli - 205.8 kMS
Pune to Dapoli - 190 kMS
For More Details ( USA contact )
Mr. Rahul Visal
+1 (630) 656-4700
www.pushpamvarsa.com

Dr. Usha Mahisekar
Memorial Sanskrit Library
Chicago, IL

YOUR NEW LIBRARY IS OPEN!

# Dr. Usha Mahisekar
## Memorial Sanskrit Library

**3691 Darlene Ct, Suite 101 Aurora, IL 60504**

SUNDAYS 10:00 AM – 12:00 PM

**Visit our library – where Indian classical languages bring ancient wisdom to life!**
**In-person weekly programs like samksheparamayanam, adityahrudayam chanting etc.**

Contact for more details:
Meera: 312-767-7728 | Lakhu Iyer : 630-730-8641
Ulka: 773-961-4571 | Laxminarayan Mahisekar: 708-752-1945

Stay tuned for more library opening days and hours!


CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"
Serving the Downtown Chicago Area & All Suburbs
BUY
SELL
INVEST
RENT
Please contact us for all of your real estate needs
Sangeeta Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 728-4871
sangeeta_chavan@yahoo.com
Hemant Chavan
Licensed Real Estate Broker
(630) 660-6231
hxchavan@yahoo.com
Free Market Evaluation of Your Property
Detailed Comparative Market Analysis to Buy or Sell Your Property
+ Primary Home
+ Investment Properties
+ Rental Properties
+ Commercial Properties
Home Staging & Extensive Network of Licensed Professionals
+ Inspectors
+ Mortgage Brokers
+ Attorneys
+ Handyman
CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"
OUR OFFICE
3135 Book Road
Naperville, IL 60564


For all Your Real Estate Needs,
Contact Us
Sangeeta & Hemant Chavan
(630) 728-4871 / (630) 660-6231
BUY, SELL, RENT, & INVEST!
In Downtown Chicago area & all suburbs. We offer quality service at every step! We treat you as our friend, not our customer.
Call us for a free consultation or market evaluation of your property!
CHARLES RUTENBERG REALTY
"The Standard of Excellence"


SANJAY MARATHE
REAL ESTATE CONSULTANT &
LOAN ORIGINATOR (NMLS # 2668043)
Ask M
ESTATE SOLUTIONS
kw INFINITY
KELLERWILLIAMS.
608 S Washington st Ste 100 Naperville IL 60540
630 915 2970
sanjaym@kw.com
kwlends.com/loan-officer/smarathe



Moksha - Liberation is eternal right of every soul
SRI UPASANA
Working for Spiritual Ritual Integration
ॐ
पा पा
श्री
स स
ना
HANUMAN
DATTATREYA
SHIVA
DEVI
GANESHA
Together in Faith,
Together in Service,
Together as One Family.
OUR SERVICES
UPASANA & BHAJAN SEVA
Bhajan, kirtan, and devotional programs for spiritual upliftment and community bonding.
PUJA & RITUAL SERVICES
Personal & family pujas, abhishek, havan, sankalp and other Vedic rituals.
PARAYAN SERVICES
Parayan of
• Ram Charita Manas
• Guru Charitra
COUNSELING & GUIDANCE
Spiritual counseling and guidance to support mental, emotional and spiritual well-being.
SPIRITUAL & CULTURAL EVENTS
Satsang, pravachan, festivals, and cultural programs for all ages.
SERVICE & VOLUNTEER OPPORTUNITIES
Be a part of seva activities and make a positive impact.
Strengthen Spirituality
Preserve Our Culture
Support All Generations
Inner Peace & Well-Being
Build a Stronger Community
JOIN US!
Be a part of our journey in spirituality, culture and service.
228 WHISPERING HILLS DR
NAPERVILLE, IL 60540
WHATSAPP
630 853 7297 / 630 664 1481
EMAIL
upasana@sriupasana.org
WEB
sriupasana.org




Let Me Help You With All Your Insurance Needs
AUTO
HOMEOWNERS
CONDO
RENTERS
LIFE
MOTORCYCLE
POWER SPORTS
BOAT
UMBRELLA
LANDLORD
RETIREMENT
Allstate
MK Insurance Group
Allstate.
You're in good hands.
Illinois: (847)305-1160
480 W Half Day Rd, Buffalo Grove, IL 60089
Helping to insure families in Illinois and Wisconsin
MK INSURANCE GROUP
Email:
MichaelKuster@Allstate.com
Please call us for a
Free Insurance Quote.
Michael Kuster
Allstate Agent


ICICI Bank
Now serving locally from
Naperville, Illinois
NRI support without time-zone hassle
Visit our Naperville office
Mall of India – Route 59, Naperville, Illinois - 60540
+1-630-873-1173
9:00 a.m. to 5:00 p.m. (CST)
Mall of India


ICICI Bank
Abhijeet Bora
Senior Relationship Manager
ICICI Bank Limited
Illinois Representative Office
776, Illinois Rte 59, Naperville, IL 60540
abhijeet.bora@icicibank.com
+1 (630) 873 1173
+1 (229) 510 2229
www.icicibankusa.com

# संपादकीय

नमस्कार प्रिय वाचक हो,

**चैत्र** शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा ही केवळ हिंदू नववर्षाची सुरुवात नसून निसर्गाच्या नवचैतन्याचा आणि मानवी उत्साहाचा संगम आहे. कडाक्याची थंडी सोसत निष्पर्ण झालेल्या फांद्या वसंताची चाहूल लागताच एका वेगळ्याच जीवनेच्छेने पुन्हा बहरून येतात.
सध्याचं जग अशा उंबरठ्यावर उभं आहे, की एकीकडे विज्ञान मानवाच्या कल्याणासाठी झटत आहे. चंद्राला फेरी मारून येणारी आर्टेमिस २ मोहीम नासाने नुकतीच यशस्वी केली. त्याच वेळी दुसरीकडे मध्यपूर्वेत चाललेल्या युद्धात हजारो लोक होरपळून निघाले.. निघताहेत. भोवतालच्या या विरोधाभासात, अनिश्चित जगरहाटीत ऋतुचक्राचं एका शांत लयीत चालत राहणं मनाला आश्वस्त करीत असतं. या वेगवान जगात मनाला अगदी हवासा वाटणारा हा निवांतपणाच जणू या सणांच्या रूपात आपण साजरा करीत असतो.
मनाला आनंद देणारी आणखी एक गोष्ट म्हणजे अक्षर वाङ्मय. रील्स आणि पॉडकास्टच्या गदारोळात आपल्या 'रचना' सारख्या माध्यमातून तुमची अभिव्यक्ती कुठेही हरवून जाणार नाही, ती इथेच कायम राहील, हा विश्वास मनाला केवढी तरी उभारी देतो.
'रचना' च्या या अंकात बाहेरच्या संघर्षमय वातावरणाचे पडसाद लेखक-कवींच्याही नकळत उमटलेले तुम्हांला दिसतील. “जे न देखे रवी, ते देखे कवी” या उक्तीप्रमाणे युद्धाच्या बातम्या, दहशतवाद, एआयमुळे जगाचं प्रचंड मोठ्या प्रमाणावर बदललेलं रूप या दृश्य गोष्टींबरोबरच संवेदनशील मनावर या साऱ्याचा होणारा परिणाम हा लेखकाच्या चिंतेचा आणि त्यामुळे लेखनाचाही भाग बनला आहे. या अंकातील साहित्यातूनसुद्धा तुम्हाला हा परिणाम जाणवल्यावाचून राहाणार नाही.
याशिवाय या अंकात तुमचं मन हलकं करणाऱ्याही गोष्टी आहेत आणि भाषेत रुळून गेलेल्या शब्दांच्या मुळांचा शोध घेणारे, ‘गंमत शब्दांची’ हे सदर, शब्दकोडे, पाककृती, व्यंगचित्रे अशा मनोरंजन करणाऱ्या ही गोष्टी आहेत.

परिस्थिती कितीही कठोर असली, तरी जगण्यातलं सौंदर्य आणि नवनिर्माणाची जिद्द सोडायची नसते, हे शिकवणारा हा सण तुमच्या आयुष्यात आनंद आणि समाधानाची शीतल सावली घेऊन येणारा ठरो, या मंगलमय शुभेच्छांसह ,

आपले
संपादक,


सुजाता महाजन


शिल्पा देशपांडे


रश्मी चाफेकर

# अध्यक्षीय

नमस्कार,

**पाच** जानेवारीला MMC ची अध्यक्षीय सूत्रे मी हातात घेतली आणि मकरसंक्रांतीला काय कार्यक्रम करायचा, याची चर्चा सुरू झाली. अनेक कार्यक्रम विविध कारणांमुळे हातातून गेले—काहींवर निर्णय घेता आला नाही, तर काही बजेटमुळे शक्य नव्हते. मग ठरवलं, की लोकल टॅलेंटला वाव द्यायचा.
बऱ्याच जणांनी लगेच होकार दिला, तर काही जण पहिला कार्यक्रम उत्तम होईल का, म्हणून थोडे साशंक होते. पण आपली कम्युनिटी एकत्र आणायची असेल, तर बाहेरून कार्यक्रम आणण्यापेक्षा आपल्या गावातील कलाकारांना संधी देणं अधिक योग्य वाटलं. आणि तिथूनच लोकल कार्यक्रमाचा निर्णय पक्का झाला.

उल्का नगरकर यांच्या Chicago Arts Lovers प्रस्तुत गदिमा आणि शांता शेळके यांच्या गाण्यांवर आधारित "नक्षत्रप्रभा" हा कार्यक्रम काही वैयक्तिक कारणांमुळे आधी झाला नव्हता, तो आपण मकरसंक्रांतीला करायचा, असं ठरवलं. कार्यक्रम तयार असल्यामुळे पुढचं काम सोपं झालं.
यानंतर venue शोध सुरू झाला आणि Schaumburg येथील हरिधाम मंदिर मिळालं. मग कार्यक्रम, जेवणाचा मेन्यू, वाण यावर चर्चा रंगली. गूळपोळी, चहा आणि पुरुषांचे वाण (भिकबाळी) याची जबाबदारी माधुरी आणि विनोद पऱ्हाड यांनी घेतली.
हरिधाम मंदिराचे अध्यक्ष डॉ. पटेल आणि जयदीपभाई दुधानी यांनी "जेवण कमी पडणार नाही" याची खात्री दिली. २०२६ ची अन्न हे पूर्णब्रह्म टीम—पल्लवी पाटील आणि टीम—यांनी जेवणाची जबाबदारी अत्यंत उत्तम प्रकारे पार पाडली.

स्त्रियांचे वाण (जोंधळेहार) रत्नांगी मालपेकर यांनी भारतातून आणले. आरास आणि डेकोरेशनची जबाबदारी मनिषा पंडित आणि टीमने सुंदररीत्या पार पाडली. "धिनक धिन धा" डान्स टीम—प्रीती उंडाळे आणि टीम—यांनी अप्रतिम सादरीकरण केले.वर्षा विसाळ ह्यांनी ही शाळा आणि मंडळाच्या कार्यक्रमाचे निवेदनही खूप छान केले.
मराठी शाळेच्या टीमचं विशेष कौतुक करावं लागेल. चेतन रेगे आणि शिकागो मराठी शाळेच्या शिक्षकांनी मुलांचे कार्यक्रम, डान्स आणि फॅशन शो अत्यंत सुंदररीत्या सादर केले. संपूर्ण कार्यक्रमाची timeline रत्नांगी मालपेकर यांनी उत्तमरीत्या सांभाळली.
"नक्षत्रप्रभा" हा दोन तासांचा कार्यक्रम—सुंदर गाणी, नृत्य आणि रश्मी चाफेकर यांचे निवेदन—यामुळे वेळ कसा गेला कळलंच नाही.
जानेवारीच्या थंडीमध्ये seniors साठी विशेष वाहन व्यवस्था करण्यात आली. श्री. नरसिम्हा कामत आणि वीर दोशी काका यांनी पार्किंग लॉटपासून मंदिरापर्यंत वाहन व्यवस्था केली. ब्रिजेन सावंत यांनी सर्वांचे हसतमुखाने स्वागत केले.
स्टेज आणि फॅसिलिटी टीम—प्रियेश देशपांडे, सुजित कुलकर्णी आणि टीम—तसेच सर्व BOD सदस्य सतत मदतीला तत्पर होते. अनिकेत सावंत आणि विष्णू महाडेश्वर यांनी सुंदर फोटोग्राफी केली.

परंपरा टीम—अनघा देऊळकर, माधुरी विनोद पऱ्हाड आणि राधिका देसाई—यांनी तिळगूळ, लाडू आणि वाण यांची सुंदर मांडणी केली. मोनिका पाटणकर (Youth Liaison) यांनी waiver forms आणि MOU ची जबाबदारी उत्कृष्टरीत्या पार पाडली. Treasurer आशिष नगरकर यांनीही आपली जबाबदारी तितक्याच दक्षतेने सांभाळली.
मकरसंक्रांतीला थंडीमुळे ढोल-ताशा आणणे शक्य झाले नव्हते, पण ऋषिकेश आणि टीमने गुढीपाडव्याला ती उणीव भरून काढली.

गुढीपाडव्याचा कार्यक्रम लार्किन highschool मध्ये झाला. जेवण, विशेषतः कढी, सर्वांना खूप आवडली. कार्यक्रमाची सुरुवात सुलाखे गुरुजींच्या शंखनादाने झाली. सत्यनारायण पूजा आणि सर्व आयोजन उत्तम पार पडले. हे सर्व करण्यासाठी फंडरेझिंग टीमने खूप मेहेनत घेतली. त्यामध्ये राहुल विसाळ, चेतन रेगे, आशिष नगरकर, उल्का नगरकर, दिपा सावंत, रत्नांगी मालपेकर यांचा सहभाग होता.
यानंतर "थेट तुमच्या घरातून" हे Five Dimensions चे नाटक शैलेश शेट्ये यांनी शिकागोमध्ये आणले. कलाकार प्रसाद खांडेकर, नम्रता संभेराव आणि ओंकार राऊत यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली. कार्यक्रमानंतरही त्यांनी प्रेक्षकांसोबत फोटो काढून सर्वांना आनंद दिला.
नाटकाच्या सेटपासून ते प्रॅक्टिसपर्यंत सर्वांनी खूप मजा केली—जणू लग्नघरचं वातावरण होतं! सलग दोन कार्यक्रम अतिशय यशस्वी झाले.
उल्का नगरकर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेचे बालक, पालक आणि शिक्षकांनी शाळेचा वार्षिक कार्यक्रम खूप छान साजरा केला. शाळेची Core टीम कविता वाडकर, मयुरा देशपांडे, अरुंधती जाधव, प्रिया तेलवेकर, अक्षरा सावंत, चेतन रेगे, निलेश अग्रवाल, आशिष नगरकर, निलेश जोशी आणि सर्व शिक्षक यांचे मनापासून अभिनंदन!
आपल्या ज्येष्ठ नागरिकांचा ग्रूप अर्थात 'फॉरेवर यंग' टीमसह "राजा शिवाजी" हा चित्रपट पाहिला.

बघता बघता चार महिने कसे गेले कळलंच नाही.

आता पुढचं लक्ष्य—"गणपती बाप्पा मोरया!"

लवकरच पुन्हा भेटू!

जय महाराष्ट्र जय शिकागो!



**दिपाली सावंत**
**अध्यक्षा, महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६**

## ‘रचना’ चमू



सुजाता महाजन - संपादक



शिल्पा देशपांडे - संपादक



रश्मी चाफेकर - संपादक



चेतन रेगे - सल्लागार



अनन्या भुसकुटे
मांडणी आणि सजावट



स्वरा सुर्वे
मुखपृष्ठ, मांडणी आणि सजावट



श्रीवल्लभ दामले
मुद्रितशोधन (इंग्रजी)

## MMC Executive Committee (केंद्रिय कार्यकारी समिती )



**दिपाली सावंत ( अध्यक्षा)**

शिकागोलॅंड परिसरात २८ वर्षांपासून वास्तव्य असून, महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) च्या नृत्य टीममध्ये सहा वर्षांहून अधिक काळ सक्रिय सहभाग.
२०२१ मध्ये MMC च्या संचालक मंडळावर (Board of Director) कार्य केले आणि परंपरा व ग्रॅज्युएशन टीमचे नेतृत्व केले. २०२२ मध्ये पुन्हा निवड होऊन परंपरा, ग्रॅज्युएशन आणि फ्लायर टीमचे नेतृत्व पुढे चालू ठेवले. २०२३ मध्ये ग्रॅज्युएशन आणि डेकोरेशन टीमचे नेतृत्व केले आणि २०२५ मध्ये पुन्हा एकदा ग्रॅज्युएशन टीमचे नेतृत्व केले.
२०२५ मध्ये BMM च्या 'रेशीमगाठी' प्रकल्पात सक्रिय सहकार्य केले. २०२६ मध्ये महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळत आहे. अध्यक्ष म्हणून नृत्य, खाद्यव्यवस्था आणि सजावट अशा सर्व टीम्ससोबत काम करताना, BMM च्या 'रेशीमगाठी' प्रकल्पाला सहकार्य सुरू ठेवले. तसेच २०२५ आणि २०२६ मध्ये मराठी शाळा टीममध्येही सक्रिय सहभाग नोंदवला.



**रत्नांगी मालपेकर -उपाध्यक्षा**

- इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी मॅनेजर
- गेली २० वर्षे अमेरिकेत वास्तव्य
- MMC २०२६ च्या कार्यकाळात मी सर्वसमावेशक कारभार आणि व्यवस्थापनावर भर देणार आहे .



**चेतन रेगे - उपाध्यक्ष**

My name is Chetan Rege, and I have been a proud resident of Chicago for over 19 years. A bibliophile and history enthusiast, I remain committed to preserving Indian heritage while nurturing a vibrant Marathi community through cultural, educational, and leadership initiatives.

It has been my privilege to serve Maharashtra Mandal Chicago (MMC) in multiple roles — Executive Committee member (2023, 2025) and Secretary (2022). I also had the honor of conceptualizing and leading the Chhatrapati Shivaji Maharaj Monument initiative (CSM 350), inspired by the legacy of Chhatrapati Shivaji Maharaj, in collaboration with dedicated volunteers and community organizations.

My other engagements include conceptualizing and administering MMC Itihas Manch (since 2021), contributing as editor of MMC Rachana Magazine (2019), and volunteering as a teacher at MMC Chicago Marathi Shala (since 2017), alongside active involvement in theatre, cultural, and educational programs.

As Vice President for 2026, I aim to bring impactful programs, energize weekly online engagement, strengthen the MMC–Marathi Shala connect, encourage wider participation, and foster collaboration among volunteers and like-minded organizations — continuing this journey of seva with humility, dedication, and a shared commitment to community growth.



**प्रियेश देशपांडे - सचिव**

- IT Professional
- गेली चौदा वर्षं अमेरिकेत वास्तव्य
- मी या वर्षी मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये सहभागी होऊन IT टीम सांभाळत आहे व त्याद्वारे अधिकाधिक मराठी लोकांना मंडळाशी जोडण्याचा माझा प्रयत्न राहील.



**आशिष नगरकर - कोषाध्यक्ष**

- Oracle Financials Consultant
- 20 years living in USA
- BMM Marketing Team - 2011
- MMC कोषाध्यक्ष - २०१३
- MMC उपाध्यक्ष - २०१७
- MMC अध्यक्ष - २०१८
- MMC सुवर्ण महोत्सव कोषाध्यक्ष - २०१९
- MMC विश्वस्त - २०१९ ते २०२१
- MMC कोषाध्यक्ष - २०२६
- likes to work and give it back to community.



**हृषिकेश घोडके**

Cloud Network Specialist (IT)
दहा वर्षांपासून अमेरिकेत वास्तव्य.
मराठी संस्कृती आणि ढोल-ताशा ही माझी आवड आहे. यावर्षी तुमच्या सहकार्याने ढोल-ताशा पथक अधिक चांगले आणि मजबूत करण्याचा माझा प्रयत्न असेल. प्रत्येक कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेऊन नवीन सदस्यांना मदत करणे आणि टीमसोबत मिळून काम करणे हे माझे उद्दिष्ट आहे.



**मनिषा पंडित**

- IT professional
- गेली दहा वर्षं अमेरिकेत वास्तव्य
- MMC २०२६ च्या कार्यकाळात विविध वयोगटांच्या लोकांना एकत्र आणून भजन सेवा आणि decorating corners हा उपक्रम राबवणार आहे. ह्याचप्रमाणे महाराष्ट्र मंडळाच्या विविध कार्यक्रम संचलनात माझा कार्यशील सहभाग राहील.

| | |
|---|---|
|  | **ब्रिजेन सावंत**<br>My family and I have been members and volunteers of MMC for several years.<br>Since 2024, I have actively taken on more roles & responsibilities in MMC teams such as<br>Facilities & stage team, Food service team, Decoration setup team, Dhol-Tasha team etc.<br>I have also worked in other international volunteer organizations in executive roles & would like<br>to bring my expertise and experience to MMC for the benefit of our community and cultural<br>heritage! |
|  | **पल्लवी पाटील**<br><br>मी सौ. पल्लवी पाटील. माझे पती अमित, मुलगी अमूल्या आणि मुलगा आदित्य असा आमचा परिवार आहे. आम्ही २००५ पासून शिकागोमध्ये राहतो आणि मी Blue Cross Blue Shield मध्ये Data Analytics विभागात कार्यरत आहे.<br>२०२३ पासून मी महाराष्ट्र मंडळ शिकागोशी सक्रियपणे जोडली गेली असून फूड, डेकोरेशन आणि परंपरा टीममध्ये volunteer आणि admin म्हणून काम केले आहे. यंदाच्या वर्षी बोर्ड ऑफ डायरेक्टर्स सदस्य म्हणून, मी फूड टीमची liaison म्हणून काम पाहणार असून डेकोरेशन आणि यूथ टीममध्येही सहभाग घेणार आहे. |



**अनघा देऊळकर**

Namaskar Mandali!
I’m Anagha Dewoolkar. This year I’m serving as one of the Board of Directors on MMC 2026 team.
I’m so excited for this opportunity. I will also be on Bhramangatha and Parampara team and serve as MMC liaison.



**सुजित कुळकर्णी**

नमस्कार,

मी सुजित कुळकर्णी महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या २०२६ च्या कार्यकारिणीमध्ये 'बोर्ड ऑफ डायरेक्टर' (अतिरिक्त संचालक) म्हणून कार्यरत आहे. पंधरा वर्षं अमेरिकेत वास्तव्यास असून व्यवसायाने मी एक आय टी प्रोफेशनल आहे .

यंदाचे ध्येय आणि संकल्प (Goals for 2026)

या वर्षी मंडळाच्या माध्यमातून मी दोन प्रमुख क्षेत्रांत योगदान देणार आहे:

१. अध्यात्मपीठ (Adhyatmpeeth):

लोकांना मानसिक शांती आणि आध्यात्मिक प्रगती साधता यावी, यासाठी 'अध्यात्मपीठ' या उपक्रमांतर्गत मी विविध अभ्यासपूर्ण आणि माहितीपूर्ण व्याख्याने आयोजित करणार आहे.

२. सुविधा संघ (Facility Team):


महाराष्ट्र मंडळाच्या विविध कार्यक्रमांसाठी सर्वोत्तम सभागृह आणि सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मी 'फॅसिलिटी टीम' मध्ये सक्रिय सहभाग घेणार आहे.

धन्यवाद



**राहुल विसाळ**

- रिअल इस्टेट गुंतवणूकदार, मार्गदर्शक आणि प्रशिक्षक
- गेली २८ वर्षं अमेरिकेत वास्तव्य
- या वर्षी मी स्पॉन्सरशिप, मार्केटिंग आणि समदुायाशी जोडणी या महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये काम करणार आहे.
- आपल्या कार्यक्रर्यमांना अधिक भक्कम पाठबळ मिळावे, नवीन संधी निर्माण व्हाव्यात आणि MMC ची ओळख आणखी व्यापक व्हावी यासाठी मी मनापासून प्रयत्न करणार आहे.

| | |
|---|---|
|  | **मोनिका पाटणकर**<br>• व्यवसायाने वकील.<br>• अरोरामध्ये 'पाटणकर लॉ' हे स्वतःचे Law Office.<br>• Estate Planning ( Will, Trust, Power of Attorney), Real Estate closing, Personal Injury, Traffic Law, Family Law इत्यादी कामे हाताळण्याचा अनुभव.<br>• गेली काही वर्षे महाराष्ट्र मंडळात कार्यरत.<br>• यावर्षी ती मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये प्रत्यक्ष सहभाग. |
|  | **अनिकेत सावंत**<br><br>अरोरा इथे राहतो.<br>गेली अकरा वर्षं अमेरिकेत वास्तव्य<br>मी कार्यक्रमाचे फ्लायर्स तयार करणार आहे आणि Facilities व IT टीमसोबत काम करणार आहे. |

| | |
|---|---|
|  | **प्रीती उंडाळे**<br><br>• Physical Therapy Technician<br>• पंधरा वर्षांपासून अमेरिकेत वास्तव्य.<br>• मी MMC २०२६ साठी डान्स टीमची जबाबदारी सांभाळत आहे. टीमसोबत विविध प्रकारचे डान्स सादर करण्याचा प्रयत्न करणार आहे. तसेच, आरास टीमलाही शक्य तेवढी मदत करणार आहे. |

## MMC BOARD OF TRUSTEES (विश्वस्त मंडळ)



विशाल नवलकर



रश्मी चाफेकर



नमीता वेदक




माधव गोगावले

## MMC INVESTMENT ADVISORY COMMITTEE (गुंतवणूक सल्लागार समिती)



चैतन्य आगाशे




पराग जोशी



श्याम अंतुरकर

Chairman, Board of trustees - BMM



नितीन जोशी

MMC'S BMM प्रतिनिधी



उल्का नगरकर

Registrar - MMC




पंकज अकोलकर


## शिकागो मराठी शाळा कर्यकारिणी



**कविता वाडकर**
शिकागो मराठी शाळा संचालिका



**अक्षदा सावंत**
शिकागो मराठी शाळा कोषाध्यक्ष



**चेतन रेगे**
महाराष्ट्र मंडळ - मराठी शाळा समन्वयक



**निलेश अग्रवाल**
शाखा संचालक - बफेलो ग्रूव्ह / व्हिलिंग



**अरुंधती जाधव**
शाखा संचालिका - नेपरव्हील



**मयुरा देशपांडे**
शाखा संचालिका -शॉम्बर्ग

## शिकागो मराठी शाळा विश्वस्त (सल्लागार)



**दिपाली सावंत**



**आशिष नगरकर**



**प्रिया तेलवेकर**



**निलेश जोशी**

# लेख

## ॥ गुढीपाडवा ॥

"**चैत्राची** सोनेरी पहाट, नववर्षाची नवी लाट" असे म्हणत आपण मोठ्या उत्साहाने गुढीपाडवा साजरा करतो. तो हिंदू पंचांगानुसार चैत्र शुद्ध प्रतिपदेला साजरा केला जातो. हा दिवस म्हणजे मराठी संस्कृतीतील नववर्षाचा पहिला दिवस आणि साडेतीन मुहूर्तांपैकी एक शुभ मुहूर्त मानला जातो.
या सणाला पौराणिक महत्व आहे. प्रभू श्रीराम रावणावर विजय मिळवून आणि चौदा वर्षाचा वनवास संपवून याच दिवशी अयोध्येला परतले होते. त्यांच्या स्वागतासाठी अयोध्येतील जनतेने घराबाहेर गुढ्या उभारल्या होत्या. असेही मानले जाते, की गुढीपाडव्याच्या दिवशी ब्रह्मदेवाने विश्वाची निर्मिती केली होती.

गुढीपाडव्याच्या दिवशी आपण घराबाहेर गुढी उभी करतो. गुढी उभारण्यासाठी बांबूची काठी वापरतात. ती काठी स्वच्छ धुवुन तिच्यावर रेशमी साडी किंवा जरीचे वस्त्र बांधले जाते. सर्वात वर तांब्याचा किंवा चांदीचा कलश उलटा ठेवला जातो. त्यावर कडुलिंबाची पाने, पुष्पहार आणि साखरेची गाठी बांधली जाते. ही सजावलेली गुढी दारात किंवा खिडकीत उंच ठिकाणी उभारली जाते. तिच्याभोवती सुंदर रांगोळी काढून, हळद-कुंकु वाहून तिची पूजा केली जाते. ही सजवलेली गुढी विजयाची आणि नवीन वर्षाच्या उत्साहाची साक्ष देते.

गुढीपाडवा हा सण केवळ आनंदाचा आणि उत्साहाचा नसून, तो आपल्या आरोग्यासाठीही अत्यंत फायदेशीर मानला जातो. गुढीपाडव्याला कडुलिंबाची पाने आणि गुळाचे मिश्रण खाण्याला विशेष महत्व आहे. हे मिश्रण शरीरातील रक्त शुद्ध करते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवते. वसंत ऋतूत, हे मिश्रण उष्णतेच्या त्रासापासून संरक्षण करते आणि पचनप्रक्रिया सुधारण्यासाठी ही आरोग्यदायी परंपरा अत्यंत फायदेशीर ठरते.अशा प्रकारे गुढीपाडवा हा केवळ सण नसून आपल्या समृद्ध परंपरेची आणि आरोग्याचा वारसा आहे. अशी ही गुढी उभारून आपण नव्या वर्षाचे स्वागत उत्साहाने आाणि प्रगतीकडे पाऊल टाकू या.



**प्रांजल प्रवीण चौगले**

# आग्र्याहून सुटका' - बुद्धी थक्क करून टाकणारी राजकीय खेळी

**आज** हॉलिवूडमध्ये किंवा बॉलीवूडमध्ये ज्या प्रकारचे मेकअपमन आहेत त्या दर्जाची मेकअप टेक्नॉलॉजी शिवकालात निश्चितपणे नव्हती. त्याकाळी बहुरूपी असायचे पण ते तात्पुरता चकवा देण्यापुरते मर्यादित काम करीत असत, जसे शिवा काशीद यांनी महाराजांना थोडं पुढे निघून जाण्यासाठी वेळ मिळवून दिला, अगदी तेवढाच मर्यादित हेतू त्यांच्याकरवी साध्य केला जाऊ शकत होता.

शिवाजी महाराजांना ओळखण्याची सर्वात मोठी खूण ही त्यांच्या कपाळावर सय्यद बंडाने केलेली जखमेची खूण होती. त्यामुळे आपला चेहरा उघडा ठेवून शिवाजी महाराज कुठेही पलायन करू शकत नव्हते.

शिवाजी महाराज कुणाच्याही शाब्दिक भरवशावर स्वतः कुणाच्या अटकेत जातील, अशी सुतराम शक्यता त्यांच्या आजवरच्या डावपेचांवरून दिसत नव्हती. मिर्झा राजेंनी कितीही हमी दिलेली असो, रामसिंहाने जामीन दिलेला असो किंवा औरंगजेबाने त्यांच्या काळकोठडीचा हुकूम काढलेला असो, महाराज आग्र्याला गेले ते त्यांच्या स्वतःच्या संरक्षणात, स्वतःच्या जामिनावर आणि स्वतःच्या हमीवर. सहजपणे आतून बाहेर येण्याची पूर्णपणे आणि निश्चित खात्री झाल्याशिवाय ते औरंगजेबाच्या अटकेत सुद्धा गेले नाहीत, असे माझे वैयक्तिक मत आहे. आग्र्याच्या दरबारात बखेडा केला तर काळकोठडी निश्चित आहे, हे महाराजांना नक्कीच माहीत होते. तरीही त्यांनी औरंगजेबाचा अपमान केला.

अपमान करून घ्यायचा नाही, दरबारात शांतच रहायचे असे त्यांनी ठरवले असते तर ते खात्रीशीररीत्या शांतच राहिले असते. आग्र्याच्या दरबारात त्यांनी मुद्दामहून तंटा उकरून काढला आणि स्वतःहून कोठडी स्वीकारली, असे माझे मत आहे. औरंगजेबाने जो दिला तो सन्मान स्वीकारून दोन महिने शांततेत आग्र्यात घालवणे त्यांना सहज शक्य होते.



महाराजांच्या अटकेचे दरबारी प्लॅनिंग अगोदरच झाले होते. त्यासाठी फुलाद खानाला अत्यंत कमी दरात, चौक्या पहाऱ्यांसाठी माणसे उपलब्ध झाली असावीत. त्या माणसांनी त्याचा विश्वास जिंकून महत्वाची वरिष्ठ पदं पटकावली असावीत.

थोडक्यात, औरंगजेबाच्या आदेशाने महाराजांच्या माणसांनीच महाराजांना नजर कैद करून ठेवले, अशी परिस्थिती आग्र्यामध्ये महाराजांनी निर्माण केली असावी. त्यातून महाराजांना फुलाद खानाकडून कोणतेही परवाने मिळविणे आणि त्या परवान्याच्या खाली वेगळेच काही करणे सहज शक्य झाले असावे. याच कारणामुळे पलायन झाल्यानंतर काही दिवस ते गुप्त ठेवणेही शक्य झाले असावे आणि महाराजांच्या जागेवर असणाऱ्या हिरोजींनाही निसटून जाणे शक्य झाले असावे.

हे सगळे घडले ते नक्की कुणाचे पहारे असताना घडले याचा शोध घेणे फुलाद खान आणि औरंगजेब या दोघांच्याही बुद्धीच्या पलीकडील गोष्ट होती. त्यांना वांझोट्या चौकशांव्यतिरिक्त काहीच करता आले नाही.

चौक्यांवर नेमलेले पहारेदार आणि जबाबदार अधिकारी सुद्धा पुन्हा कधीच पगार घेण्यासाठीही आले नसावेत आणि ते सापडले सुद्धा नसावेत.

औरंगजेबाच्या आदेशाने फुलाद खानाच्या कडक नजरेखाली, महाराजांनी स्वतःच स्वतःला नजरकैदेत ठेवले आणि त्यांना जेव्हा वाटले तेव्हा ते आग्र्याहून निघूनही गेले.
महाराजांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास केला तर आग्र्याला महाराज त्यांच्या मर्जीने गेले आणि जेव्हा त्यांची मर्जी झाली तेव्हा ते तिकडून राजगडावर उजळ माथ्याने निघून आले, त्यात औरंगजेब किंवा मिर्झाराजे किंवा फुलाद खान ही फक्त प्यादी होती

औरंग्याचे प्रशासन जोखणे त्यातील कच्चे दुवे हेरणे त्याला त्याच्या प्रशासकीय आणि सामरीक मर्यादांची जाणीव करून देणे आणि हे बादशहापण किती पोकळ आणि कमकुवत आहे, याची जाणीव त्याला देऊन त्याला हादरवून सोडणे आणि मी आता आग्र्यापर्यंत पोहोचलो आहे, हा संदेश त्याच्यापर्यंत पोहोचविणे, हा आग्र्याच्या भेटीचा स्पष्ट राजकीय हेतू होता. असा माझा निष्कर्ष निघतो.

आग्र्याहून झालेली सुटका हा मिर्झा राजांच्या मुत्सद्देगिरीचा सपशेल पराभव होता.

औरंगजेबाच्या प्रचंड आणि सुसज्ज सैन्याचा तर त्यांनी पांगुळगाडा करून टाकला होता.
आपल्याला शरण आला आहे असे समजून आपण ज्या माणसाशी व्यवहार केला, ज्या व्यक्तीला हिताच्या चार गोष्टी सांगितल्या, बादशहाच्या चाकरीतच कसे कल्याण आहे, हा बाळबोध शहाणपणा गळी उतरवला, ती व्यक्ती प्रत्यक्षात बादशहाची पण राजकीय बाप निघाली.

आपल्याबरोबर चर्चेत आणि तहात घालवलेला वेळ हा प्रत्यक्षात आग्र्यातील तयारी करण्यासाठी लागलेला वेळ होता. तहाच्या चर्चा निगोसिएशन्स बोगस होती, तो आपल्याबरोबर खेळलेला एक खेळ होता. त्याने आपला निव्वळ प्यादा म्हणून वापर केला आहे, आपल्या मुत्सद्देगिरीचा राजकीय चातुर्याचा याने फक्त संधी म्हणून वापर केला आहे, हा विचार मिर्झाराजांना आयुष्य पोकळ आणि रिकामंच राहून गेल्याची जाणीव करून देणारा होता, बुद्धी शून्य करणारा हा अनुभव होता.

महाराजांवर चाल करून येणाऱ्या इतर सरदारांप्रमाणे मिर्झाराजांचाही बुऱ्हाणपूरला दारुण शेवट झाला, तो औरंग्याने घडवून आणला.

स्वराज्याचे कमीतकमी नुकसान होऊन औरंगजेबाचा हल्ला पुरंदरपासूनच परत पाठवून देऊन आमचे लक्ष्य आता दिल्ली आहे, हा स्पष्ट संदेश मुगल सलतनतीला मिळाला आणि पराभूत झालेलं प्रचंड सैन्य विजयाची मस्ती साजरी करीत दिल्लीला परत पाठवलं गेलं.

पुरंदरचा तह ही एक सोचीसमझी राजकीय चाल होती, महाराज कोणत्याही आर्थिक किंवा राजकीय कोंडीत अजिबात सापडलेले नव्हते. ते पूर्णपणे सावध होते, तह हे फक्त एक नाटक होते आणि त्यांनी मिर्झाराजांच्या सकट औरंगजेबालाही बेसावध ठेवले होते.

भारतातील बलाढ्य राजसत्तेचा अहंकार तोफेच्या तोंडी देऊन, त्यांची अंतर्गत सुरक्षा व्यवस्था संपूर्णपणे ताब्यात घेऊन, त्यांच्या सैन्याचा पांगुळगडा करून तो संभाजी राजांकरवी ओढत ओढत त्यांना दिल्लीत आणून देऊन, त्यांच्या दरबारी चातुर्याचा खुळखुळा करून महाराजांनी औरंगजेबाला तख्तावर बसल्या बसल्या दरदरून घाम फोडला होता.

महाराज पेटाऱ्यातून पळाले की वेष बदलून पळाले? या तर्काच्या अहंकारात जगातील भल्या भल्या इतिहासकारांची बुद्धी लढवत ठेवून महाराज आपली खरी खेळी गुप्त ठेवून राजकीय हेतू साध्य करून गेले. लोकं पेटाऱ्याच्या लांब्या रुंद्या आणि वजनमापं घेत भांडत बसले.

महाराज उजळ माथ्याने आग्र्यात आले आणि जसे आले तसेच गेले. जाण्याच्या अगोदर रामसिंगाचा जामीन रद्द करण्याच्या बहाण्याने ते पुन्हा एकदा औरंग्याला भेटून सुद्धा आले आणि जसे आले तसे उजळ माथ्याने निघूनही गेले. ते जितके दिवस होते तितके दिवस आग्र्यावर महाराजांची हुकूमत होती. बादशहाचे तख्त केवळ नाममात्र होतं.

ही अंगावर सरसरून काटा आणणारी मराठ्यांची दहशत पुढे औरंग्याला महाराष्ट्रात घेऊन आली.




**विनय भालेराव.**

# गेला विनोद कुणीकडे

**मराठी** माणसाच्या आयुष्यात हास्य हा नेहमीच एक ‘सीरियस’ विषय राहिलाय—हो, सीरियस! कारण आपण हसतो तेव्हा फक्त दात दिसत नाहीत, तर मनावरचा सगळा ताण  हलका होऊन मन प्रफुल्लित होतं. एके काळी पु. ल. देशपांडे यांच्या लेखणीतून, व. पु. काळे यांच्या कथांमधून जेव्हा विनोद यायचा, तेव्हा तो केवळ हसवायचा नाही, तर हलकासा चिमटा काढून विचारही करायला लावायचा. आजकाल मात्र “हाहा” आणि "LMAO",“LOL” हे इमोजी जास्त हसतात… आणि आपण थोडे कमी हसतो.

पूर्वी विनोद हा प्रसंगातून उगवायचा—एखाद्या साध्या वाक्यातून, एखाद्या छोट्याशा निरीक्षणातून. आजकाल मात्र विनोदाचा अर्थ थोडासा ‘टाईमपास’ इतकाच झाला आहे. शारीरिक वैशिष्ट्यांवर टिप्पणी, किंवा ‘समजलं का?’ टाइप डबल मीनिंग पंच—बस्स! जणू विनोदाला आता विचारांची गरज नाही, फक्त ‘टायमिंग’ आणि ‘ट्रेंडिंग’ पुरेसं आहे. WhatsApp हे नवीन ‘साहित्य संमेलन’ झालंय, जिथे “Forwarded as received” हेच लेखकाचं नाव असतं.



चित्रपटांमध्येही हीच कथा. एखादा जोक इतका ओळखीचा वाटतो की वाटतं—“हा आपल्या ग्रुपमध्ये कालच आला होता!” कदाचित दिग्दर्शकही आपल्या ग्रुपमध्ये असेल. कंटेंट तयार करण्यापेक्षा ‘ रीसायकल’ करण्याची कला जास्त फोफावली आहे. आणि त्यातही आपण प्रेक्षक म्हणून खुश—कारण आपल्याला ओळखीचं हसू आवडतं.

पण सगळंच अंधारमय नाही. आजही काही दीपस्तंभ आहेत. “महाराष्ट्राची हास्यजत्रा” सारखे कार्यक्रम अजूनही खऱ्या विनोदाला व्यासपीठ देतात. इथं विनोद हा केवळ ‘पंच’ नसतो, तर एक विचार, एक निरीक्षण, एक अनुभव असतो. त्याचप्रमाणे प्रशांत दामले, संकर्षण कऱ्हाडे, गुरु ठाकूर, सौमित्र यांसारखे कलाकार अजूनही सर्जनशीलतेचा किल्ला सांभाळून उभे आहेत. ते आपल्याला आठवण करून देतात, की विनोद अजून जिवंत आहे—फक्त त्याला योग्य दाद हवी.

आणि इथेच आपली—प्रेक्षकांची—जबाबदारी सुरू होते. आपण ‘राजहंस’ व्हायला हवं. दूध आणि पाणी वेगळं करण्याची ताकद असलेला राजहंस! खरा, दर्जेदार विनोद आणि उगाच ‘फॉरवर्ड’ केलेला विनोद यात फरक ओळखायला हवा. आपण जे पाहतो, शेअर करतो, त्यातूनच ट्रेंड तयार होतात. आपण जर चांगल्या विनोदाला प्रोत्साहन दिलं, तर तोच पुढे वाढेल.

हे मान्य करावंच लागेल, की काळानुसार विषय बदलतात. सिच्युएशनल कॉमेडी, शब्दिक विनोद—हे आता आपल्याला परिचित झाले आहेत. पण मग नवीन विषय का नाही? आजच्या काळात किती गोष्टी आहेत ज्या विनोदासाठी ‘सोन्याची खाण’ ठरू शकतात—युद्धाच्या छायेत जगणारे लोक, नोकरीची अनिश्चितता, व्हिसाच्या चिंता, मानसिक आरोग्याचे प्रश्न… भारतीय माणूस या सगळ्यातून ‘manage’ करतो—आणि तेही एका वेगळ्या शैलीत! ह्याच अनुभवांमध्ये किती भन्नाट, सूक्ष्म विनोद दडलेला आहे.

नवीन लेखकांसाठी हे विषय ‘वैचारिक खाद्य’ ठरू शकतात. फक्त गरज आहे ती निरीक्षणाची, संवेदनशीलतेची आणि थोड्या धाडसाची.
माणूस आज हसतोय, याबद्दल शंका नाही; शंका इतकीच आहे, की तो कशावर हसतोय, हे त्यालाच माहीत आहे की नाही. हल्ली हसू फार स्वस्त झालं— जिथे वेळ मारून न्यायची असते तिथे ते वापरतात आणि जिथे थांबून विचार करायला हवंच, तिथे ते पटकन उडवून देतात.
खरं तर विनोद ही फक्त करमणुकीची वस्तू नसते; ती माणसाला जिवंत ठेवणारी गरज असते. शब्दांना वेळ दिला, माणसांकडे नीट पाहिलं आणि स्वतःच्या मूर्खपणाकडे थोड्या खेळकर नजरेनं पाहायची तयारी ठेवली, की विनोद कुठे आहे हे शोधावं लागत नाही तो आपोआप सापडतो. तो कधी एका वाक्यात, क धी एका सवयीत,तर कधी आरशात पाहून अचानक फुटलेल्या हसण्यात दिसतो. म्हणून फार काळजी करू न ये.मराठी माणूस आहे तोपर्यंत आणि त्याला स्वतःवर हसता येतंय तोपर्यंत विनोद कधीच संपणार नाही फक्त तो शोधायची सवय आपल्याला परत लावावी लागेल.
विनोद आपल्या आजू बाजूला, छोट्या-छोट्या गोष्टींमध्ये शोधला, की तो अलगद सापडतो. आपल्यातला ‘क्रिएटिव्ह’ माणूस जागा करायची वेळ आली आहे. कदाचित पुढचा पु. ल. कुठेतरी तयार होत असेल… किंवा कदाचित तो आपणच असू शकतो! तोपर्यंत, हसत राहूया—
शेवटी, प्रसिद्ध उक्तीप्रमाणेच, एक "वैद्य" म्हणून सांगतो, " Laughter is the best Medicine".

हास्याची कॅसेट होती, आता झालाय ‘रील’,
जोक्स झाले फॉरवर्ड, आणि भावना झाल्या ‘डील।
राजहंस व्हायचं म्हणतो, पण वेळ कुणाला आहे?
जोरात धावायच्या या काळात, थांबायचं कुणाला आहे?

आशा आहे आपल्यातूनच बनतील पुढचे पु. ल.
आणि देतील वाचकांना विनोदाची कॅप्सूल
नक्कीच सुधारेल क्रिएटिव्हिटी चा "सीन"
वैद्य म्हणे Afterall, Laughter is the best Medicine



**विक्रांत सतीश वैद्य, शिकागो**

# आगळी आणि वेगळी जिल्हा परिषदेची टेमगिरवाडी मराठी शाळा

**अखंड** हरिनाम सप्ताहासाठी ह.भ.प. श्री. रंगनाथ महाराज यांच्या वारकरी कीर्तनासाठी आम्ही टेमगिरवाडी या गावी गेलो होतो. हरिनाम सप्ताह- शेवटचा दिवस म्हणजे काला कीर्तन संपवून आम्ही दुसरीकडे एका कार्यक्रमासाठी जाणार होतो. सकाळी सकाळीच लवकर टेमगिरवाडीत पोहचलो. आयोजकांनी कीर्तन सकाळी साडेनऊऐवजी साडेदहाला पुढे ढकलले. मधल्या वेळात गावातील शाळेच्या विश्वस्तांनी आम्हाला शाळा दाखवण्यासाठी त्यांच्या शाळेतील शिक्षक श्री. रामकृष्ण वाटेकर यांना बोलावले. ह्या शाळेतील शिक्षणपद्धतीने आम्हाला एकदम अचंबित केले आणि एक प्रकारचा सुखद धक्का बसला. संपूर्ण महाराष्ट्रात सध्या होत असलेली मराठी शाळांची वाताहत थांबविणारी ही शाळा वाटली. नवीन पिढीसाठी मराठी भाषा जपण्याचा एक आशेचा किरण दिसला.
शाळेतील चार भिंतीच्या आत चालणाऱ्या वर्गाऐवजी मुलांना इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, पर्यावरण, याचा अभ्यास शाळेबाहेरील पटांगण आणि मुलांना खेळण्याच्या जागेत असणाऱ्या सोयी आणि झाडाखाली एक मोठा पार केलेला पाहून आपण महाराष्ट्रातील एका छोट्या गावात की गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांनी चालविलेल्या शांतिनिकेतन शाळेत आहोत, असे वाटत होते.



शाळेतील पटांगणात झाडाखाली शिकणारे विद्यार्थी

या जिल्हा परिषदेच्या शाळेला भारतातील उत्कृष्ट ५५ शाळांमध्ये व महाराष्ट्रातील पाच उत्कृष्ट शाळांपैकी एक शाळा म्हणून गौरवित करण्यात आले आहे. शाळेतील दूरदृष्टी आदर्श शिक्षक श्री. रामकृष्ण वाटेकर यांनी त्यांच्या शाळेविषयी आम्हाला अतिशय सखोल माहिती सांगितली. तेवीस वर्षे ते या शाळेत शिकवत आहेत. इतर शाळांपेक्षा एका विशिष्ट प्रकारे मुलांना शिकवले जाते. त्या त्या विषयामध्ये प्रवीण असलेल्या विद्यार्थ्याला वर्गप्रमुख म्हणून निवडतात. हे वर्गप्रमुख इतर विद्यार्थ्यांबरोबर स्वयंशिक्षण घेत असतात. पहिली ते चौथी या वर्गातील मुलांना चार भिंतीच्या आत शाळेत पुस्तकातील धडे शिकविण्या ऐवजी त्यांना बाहेर नेऊन नैसर्गिक वातावरणात खेळत बागडत व प्रतिकृतीद्वारे मुलांना घोकंपट्टी न करता प्रत्यक्षरीत्या शिकवले जाते. भारताचा नकाशा, राजगड, महाराष्ट्र, पुणे जिल्हा यांच्या नकाशांचे बारीक सारीक गोष्टी दाखविणाऱ्या सखोल प्रतिकृती करून त्याचे शिक्षण दिले जाते. गणिताचे देखील वेगवेगळ्या मॉडेल्स मार्फत त्यांना बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार इत्यादी शिकवले जाते.
जीवनोपयोगी शिक्षणावर या ठिकाणी जास्त भर दिला जातो. वेगवेगळी रोपे कशी वाढवायची, त्याची निगा कशी ठेवायची, वेळेवर पाणी व खुरपणी करून त्यापासून उत्पन्न कसे काढले जाते, हेही त्यांच्याकडून करविले जाते.

भारताच्या नकाशात असलेले पर्वत, नद्या, वेगवेगळी महत्त्वाची शहरे, प्रांत, राज्य त्या भागातील वेगवेगळ्या चालीरीती व संस्कृती त्यांना शिकवली जाते, नव्हे तर विद्यार्थी स्वतः शिकतात.



शाळेतील पटांगणात भारताचा भूगोल शिकविण्याची जागा



महाराष्ट्र आणि पुणे जिल्हा - समाज शास्त्र शिकण्याची जागा



पुणे जिल्ह्यातील गडांच्या केलेल्या प्रतिकृती

या शाळेतील चौथीची मुले केंद्र परीक्षेमध्ये नेहमीच गुणानुक्रमे सातत्याने क्रमवारीत वरच्या स्थानावर असतात. हे ऐकून तर मी भारावून गेलो. साधारणतः इतर शाळांमध्ये मुलांना घोकंपट्टी करण्यावरच खूप भर असतो, परंतु या शाळेत स्वयंस्फूर्तीने, व्यवहारिक आणि नैसर्गिक शिक्षण मिळाल्यामुळे ही मुले क्रमवारीत बरीच वरच्या स्थानावर येतात. या शाळेतील शिक्षक श्री. रामकृष्ण वाटेकर व श्री. दीपक रेटवडे खरोखर मुलांना जीवनाचा मार्ग दाखवत आहेत. दररोज साधारणपणे बारा ते पंधरा तास ते या शाळेसाठी झटत असतात. खेड तालुक्यातील साठ सत्तर घरांची वस्ती असलेल्या टेमगिरवाडी या गावातील लोकसंख्या त्यामानाने कमी (तीनशे पेक्षा कमी) असूनही टेमगिरवाडीतील गावकरी आणि ग्रामस्थ महिला

असल्या आदर्श शिक्षक आणि आदर्श शाळेसाठी लागणारी मदत करण्यासाठी नेहमीच तत्पर असतात. शाळा व्यवस्थापन अध्यक्ष श्री. संपत टेमगिरे हे तर सदैव प्रत्येक कामामध्ये जातीने लक्ष घालून स्वतः पाहुण्यांसाठी व शाळेसाठी सतत राबताना दिसत होते. अनेक महिला आपल्या घरचाच कार्यक्रम आहे, असे वागून आलेल्या पाहुण्यांचा आदरपूर्वक पाहुणचार करत होते. शिक्षणाला पूर्ण वाहून घेतलेले हाडाचे शिक्षक, शक्य होईल तेवढी मदत करणारे शाळा व्यवस्थापक, आणि गावातील शाळा ही आपलीच आहे याची जाणीव ठेवणारे गावातील ग्रामस्थ असा हा सर्वांचा सुंदर संगम घडून येत असल्यामुळे या लहानशा गावातही राष्ट्रीय पातळीवर गाजणारी आदर्श शाळा व विद्यार्थी घडत आहेत. It takes a village to raise the child म्हणीप्रमाणे गावातील अबालवृद्ध मंडळी शाळेतील कार्यक्रमासाठी झटत असल्याचे दिसून येत होते. टेमगिरवाडी गावात झालेल्या दोन्ही कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा स्वावलंबीपणा आणि स्वयंसेवकपणा प्रकर्षाने जाणवला. वेगवेगळ्या ठिकाणी शिक्षक नसतानाही अनेक विद्यार्थी स्वतःहून विविध कामांमध्ये मदत करताना दिसत होते. त्या शाळेत चालणाऱ्या शैक्षणिक उपक्रम तसेच वेगवेगळ्या क्षेत्रावर विचारलेल्या प्रश्नांची माहिती अतिशय समाधानपूर्वक देत होते. विद्यार्थ्यांमध्ये स्वयंदिशा, स्वयंशिस्त, आणि आत्मविश्वास प्रकर्षाने जाणवत होता.



शाळेतील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना



शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व प्रशासकीय चमूसोबत

मराठी माध्यम असणाऱ्या जि. प. प्राथमिक शाळा टेमगिरवाडी शाळेला राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण शाळांची संख्या १ लाख ८ हजार २५० असून त्यामधे दोन कोटी १२ लाख ७२ हजार ६११ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार देशभरात एक कोटीपेक्षा जास्त शिक्षक संख्या कार्यरत आहे. यामधून राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन आणि प्रशासन संस्था ( NIEPA ), नवी दिल्ली या भारत शिक्षण मंत्रालयाकडून देशभरातील ५५ सर्वोत्कृष्ट शाळा म्हणून दिनांक ६ जानेवारी २०२६ रोजी निवडण्यात आल्या. त्यामध्ये आपल्या महाराष्ट्र राज्यातील ४ शाळांचा समावेश होता. (पुणे जिल्हा - टेमगिरवाडी , नंदूरबार जिल्हा- तोरणमाळ , अहिल्यानगर जिल्हा - वाघोली , गडचिरोली जिल्हा - शिवनीपथ ) देश पातळीवरील ५५ शाळांमधे एकूण विद्यार्थी पटसंख्येनुसार सर्वात लहान द्विशिक्षकी शाळा म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टेमगिरवाडीची राष्ट्रीय स्तरावर निवड ही या लहानशा गावासाठी विशेष अभिमानाची बाब आहे.

National Conference on Successful School Leadership : Innovative Pathways for Viksit Bharat @2047 साठी संपूर्ण देशभरातून निवड झालेल्या ५५ शाळांची राष्ट्रीय परिषद NCERT नवी दिल्ली या ठिकाणी संपन्न झाली होती. त्यामध्ये जि. प. प्राथमिक शाळा टेमगिरवाडीच्या नवीन उपक्रमांचे विशेष कौतुक करण्यात आले.
टेमगिरवाडी शाळेत शालेय विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. शालेय चार भिंतींच्या बाहेरील समृद्ध अध्ययन अनुभव देण्याच्या पद्धतीचे राष्ट्रीय परिषदेमधे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये तार्किक विचार, प्रभावी संवाद कौशल्य, आत्मविश्वास, सहयोग, स्वयं दिशा, स्वयंशिस्त, देश अभिमान जागृती या भावनांची जाणीव होण्यासाठी Arts integration, sports integration and Toy based Pedagogy या मुद्यांच्या आधारे अनुभवात्मक अध्ययन अनुभव घेण्याची उत्कृष्ट संधी शाळा टेमगिरवाडी शाळेत विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जाते. टेमगिरवाडीने जानेवारी २०२६ व फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्य स्तरावर पाच स्पर्धेत अव्वलस्थानी येऊन उत्कृष्ट कामगिरी पार पाडली आहे. त्यामध्ये शाळेला - १. राज्य शालेय गुणवत्ता मानंकनात अ + श्रेणी २. अनुभवात्मक अध्यापन स्पर्धेत राज्यात प्रथम क्रमांक ३. राज्यस्तरीय शिक्षक - अधिकारी डॉक्युमेंट्री स्पर्धेत राज्यात पाचवा क्रमांक ४. हरित शाळा पुरस्कार - चार लाख रुपयांचे जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक ५. पुणे जिल्हा उत्कृष्ट शाळा अध्यक्ष चषक पुरस्कार.


पाच मिनिट सादरीकरणात प्रथम पारितोषिक मिळविलेले विद्यार्थी

हरित शाळा अवॉर्ड टाटा मोटर्स व पर्यावरण शिक्षण केंद्र पुणे आयोजित टाटा मोटर्स बिकन हरित शाळा अवॉर्ड कार्यक्रमाचा बक्षीस वितरण सोहळा २७ मार्च २०२६ रोजी टाटा मोटर्स पिंपरी चिंचवड येथे पार पडला. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा टेमगिरवाडी काळुस, तालुका खेड या शाळेस ग्रामीण शासकीय शाळा विभागातील द्वितीय क्रमांकाचे चार लाखाचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमानंतर.विद्यार्थी व शिक्षकांसाठी टाटा मोटर्स कंपनीच्या सफारी आणि हॅरिअर या दोन कारचे उत्पादन होत असलेल्या ठिकाणी कारखाना सहल आयोजित करण्यात आली होती. रस्त्यावर धावणाऱ्या मोटारी प्रत्यक्षात कशा तयार होतात हे पाहण्याचा प्रत्यक्षदर्शी अनुभव विद्यार्थ्यांना मिळाला. विशेष म्हणजे हा संपूर्ण कारखाना महिला इंजिनियर्स व कामगार चालवतात हे पाहून विद्यार्थ्यांना आश्चर्य वाटले व प्रेरणाही मिळाली.
कधी कधी आपल्याला आश्चर्याचे धक्के बसत असतात. जाणार होतो एका कार्यक्रमाला पण अचानक असल्या आदर्श शाळेला भेट देता आली व एका आगळ्या वेगळ्या शाळेच्या शैक्षणिक पद्धतीची माहिती मिळाली. आणि हो, त्याहून आणखी एक दुधात साखर पडावी असला एक गोड प्रसंग अनुभवायला मिळाला. एक आठवड्यानंतर त्या शाळेत सुमारे चाळीस शैक्षणिक क्षेत्रातील अधिकारी आणि केंद्रप्रमुखांसाठी प्रशिक्षण शिबिर आयोजित केले होते.

त्या शिबिरामध्ये मला निमंत्रित वक्ता म्हणून बोलवले आणि त्यात प्रेरणादायी भाषण करण्याची व त्या सर्वांबरोबर संवाद साधण्याची संधी मिळाली.


सध्या महाराष्ट्रात अनेक मराठी शाळा एकामागे एक बंद होत आहेत. मराठी भाषेचे बुरुज ढासळत आहेत. पण हे शिबिर व टेमगिरवाडी शाळा पाहिल्यानंतर या शाळा आणि श्री. रामकृष्ण वाटेकरांसारखे आदर्श शिक्षक यांच्यामुळे मराठी भाषेचे ढासळणाऱ्या बुरुजांची डागडुजी करून निदान ग्रामीण भागात तरी मराठी शाळा निश्चितच तग धरून राहतील, आणि मराठी भाषेचे संवर्धन होत राहण्यासाठी खारीचा का होईना, वाटा उचलून योगदान देत राहतील, यात काहीच शंका नाही.



केंद्रप्रमुख आणि शैक्षणिक प्रशिक्षण शिबिर




शिक्षक श्री. वाटेकर व श्री. रेटवडे व शिक्षणाधिकारी श्री. अमोल जंगले यांच्यासोबत



**माधव ना. गोगावले**

# तीन क्ष - लक्ष, दक्ष आणि मोक्ष!

नंदाची चिडचीड आज जरा जास्तच वाढली होती. कियाराला समजतच नव्हतं, मम्माला कसं समजवायचं? कियाराच्या मते मम्मा आता पंचावन्न वर्षांची झाल्यामुळे कोणत्याही छोट्या छोट्या गोष्टींमुळे चिडायला लागली होती. निशांत म्हणजे कियाराचा बाबा, मागच्या वर्षीच वयाच्या अवघ्या साठाव्या वर्षी हृदयरोगाने देवाघरी गेला आणि नंदा एकटी पडली, मुंबईत. कियारा पंचवीस वर्षांची, पुण्याला छान नोकरी करायची. दोन-तीन महिन्यातून एकदा भेटायला यायची. पण आज नंदाचा होरा काही वेगळाच होता. आज मात्र कियाराने निश्चय केला आणि मम्माला, आपला थेरपिस्ट मित्र, कबीरकडे घेऊन जायचं ठरवलं.

“मम्मा, आज आपण कबीरकडे  जाणार आहोत, कारण तुला बऱ्याच गोष्टींचा त्रास होतोय आणि त्यावर माझ्याकडे सोल्युशन नाही.”
“अगं, तो तुझ्या वयाचा मुलगा मला काय समजून घेणार आणि काय सांगणार, त्याला काय कळतंय?”
“अगं मम्मा, सगळं कळेल त्याला, अगदी काही नाही तर मला तरी आज तुझ्या तक्रारी ऐकायला नकोत, त्याला ऐकू दे!”

शेवटी शंभर एक प्रश्नोत्तरांनंतर नंदा आणि कियारा कबीरकडे पोचल्या.
“ये  मावशी, बस. कियारा, तू तुझं काम करून ये.” कबीरने फर्मावलं.
“पण तिचं काही काम नाहीये.” इति नंदा.
“आधी नव्हतं, पण आता आहे.” कबीर म्हणाला आणि त्याने त्याचं खळीदार स्मित, कियाराकडे फेकलं आणि दरवाजाकडे निर्देश केला.
कियारा हसली आणि म्हणाली “ममा, काही काळजी करू नकोस, मी येतेच.” आणि ती पटकन निघून गेली.

मग मात्र नंदाने कबीरकडे थोडं नीट लक्ष दिलं. कियारासाठी चांगला मुलगा आहे का हा लग्नासाठी? एक टिपिकल विचारसुद्धा तिच्या मनात येऊन गेला. पण कबीरने चुटकी वाजवली आणि त्या आवाजाने ती भानावर आली.
“मावशी, कॉफी घेणार? मी मस्त नेसकॉफी करतो.”
“चालेल, थोडी स्ट्रॉंग हा”
“अरे वा, मी सुद्धा स्ट्रॉंगच घेतो. ये ना, हा इथे छोटा कॉर्नरच आम्ही ‘कबीर कॅफे’ म्हणून बनवलाय.”

दोघंही त्या खोलीच्या, उजव्या बाजूच्या कोपऱ्यात गेले आणि नंदाचे डोळे लकाकले, अतिशय नीटनेटका, एकदम गुलाबी आणि निळ्या रंगात सजवलेला तो कोपरा होता. कॉफी बनवायला छोटीशी हॉट प्लेट, चार मग, चार बश्या, चार बाउल, काही चमचे, काटे असे मस्त ठेवलेले होते. भिंतीवरच्या कपाटात काही पुस्तकं होती. एक छोटंसं टेबल आणि दोनच खुर्च्या. टेबलावर एक छान फुलांचा गुच्छ.

तिथल्या सर्व गोष्टी बघत असताना, नंदाच्या मनात तो विचार डोकावलाच. शाळेनंतर तिला ‘इंटिरियर डिझायनिंग’ करायचं होतं, पण ॲडमिशन नाही मिळाली आणि मग त्या इच्छेचं स्वप्नात रूपांतर होऊन, ते स्वप्नच राहिलं. ती तिथली पुस्तकं, बघायला लागली, अरे किती दिवस झाले, काही पुस्तकं वाचायचीच राहिलीत. फुलांची रचना करायला तिला शिकायचं होतं पण कधी सगळ्या रहाटगाडग्यात त्याची आठवणच झाली नाही. आज या टेबलावरच्या गुच्छाने त्याचीही आठवण करून दिली. त्या सगळ्यांवरून एक हात फिरवल्यावर तिला इतकं छान वाटलं.

तेवढ्यात कॉफीच्या कपातल्या चमच्याच्या आवाजाने ती भानावर आली.
“मला खूपच आवडला हा कॅफे, एकदम मस्त.”
“कियारा सांगत होती, तुमच्या घराजवळच पण एक आहे ना? ‘मिसळ आणि मोका’, काही आवडलं का तिथलं?”
“नाही रे, अजून मुहूर्तच आला नाही.”
“म्हणजे? कॅफेत जायला मुहूर्त?”
“अरे म्हणजे, आम्ही पाच मैत्रिणी जाणार होतो, पण आयत्या वेळी त्यातल्या तिघींनी रद्द केलं आणि मग जी एक उरली होती ती म्हणाली, दोघीच कुठे जाणार, नंतर सगळ्याजणींबरोबर जाऊ या आणि मग नाहीच झालं.”

“अरे, मग दुसऱ्या कोणाबरोबर जायचं,  एकच मैत्रिणींचा ग्रूप आहे का तुझा?”
“अरे.....दुसऱ्या पण मैत्रिणी आहेत ना, पण त्यांची वेगळीच तऱ्हा. त्या ग्रुपमध्ये फक्त मीच नेहमी ‘कधी भेटायचं?’ म्हणून ग्रूप जागा करते आणि मग त्यावर एक तीन चार दिवसांनी एखादा रिस्पॉन्स येतो. मग अशा वेळी काय करू? मीच जाऊ का नेहमी यांच्या मागे मागे?”

“पण तुला त्यांना भेटायला आवडतं म्हणून तू विचारतेस की..... ?” कबीरने तो प्रश्न मुद्दामच अपूर्ण सोडला.

“म्हणजे मला आवडतं रे, पण दर वेळी सगळं प्लॅन करायचं म्हणजे आणि लोकांना जर मला भेटायचंच नसेल तर मला पण वाईट वाटतं रे? इतकं कोणी बिझी असतं का? पण, कोणाकडे मोठं फंक्शन किंवा पार्टी असू दे, सगळ्यांना बरोबर वेळ मिळतो. मोठे ग्रूप्स हवेत, शो ऑफसाठी.” नंदा तणतणली.
“हे तुला कसं कळलं, म्हणजे त्यांनी सांगितलं की काय?” इति कबीर
“नाही रे, मला स्वतःलाच ते वाटतं.”

“अगं, मग शाळेच्या मैत्रिणींनाच तिथे भेटायला बोलवायचं, त्या तर नेहमी हक्काच्या असतात ना?”
“असतात नाही, होत्या. मध्ये आमचे काही वाद झाले आणि मग बोलणंच खुंटलं.”
“अगं, मग नको जाऊस. तुला कोणी सांगितलंय का कोणाच्या मागे मागे करायला?”

“नाही रे, असं कोणी सांगत नाही, पण सोशल लाईफ नको का? कियाराला पण तिचं आयुष्य आहे आणि समवयस्क नकोत का बरोबर? आयुष्य एकदाच मिळतं, मग सेलेब्रेशन, गप्पा-टप्पा, सोशल ॲक्टिव्हिटीज नकोत का?”

“अगदी हव्यात नंदामावशी, पण त्यांनी जर तुझा मानसिक ताण, इतका वाढणार असेल, तर त्यांचा फायदा होण्याऐवजी तोटाच दिसतोय मला. अगं, या पृथ्वीतलावर आपण एकटेच आलो आणि एकटेच जाणार, मग कधीतरी, एकटंच आयुष्य जगलो किंवा एकटीनेच त्याचा आनंद घेतला तर बिघडलं कुठे?”

“म्हणजे, तुला या सर्वांत दुसऱ्यांचं काहीच चुकीचं वाटत नाही? माझंच चुकतंय?” नंदाने कॉफीचा एक घोट घेतला. पण आता मात्र तिच्या डोक्यात विचार चालू झाले होते.

“चुकत कोणाचंच नाही. प्रत्येक जण, तू, तुझ्या मैत्रिणी, कियारा, सगळेच आपापल्या बाजूने बरोबरच असतात. जे निर्णय ते घेतात, ते नक्की कशामुळे, हे मात्र आपल्याला माहीत नसतं. आपल्याला फक्त तो निर्णय दिसतो पण त्यामागची कारणं, परिस्थिती, मात्र दिसत नाही. काहींना नाही ती नीट सांगता येत, आणि मग आपल्या मनात मात्र त्यांच्याबद्दल गैरसमज होतो आणि आपण त्यातच गुंतून आपला वेळ, आनंद वाया घालवतो.”

“म्हणजे, मला नाही समजत तू काय म्हणतोस ते”

“तुझ्या एकंदर बोलण्यावरून असं दिसतंय, की तुला ज्या गोष्टी करायच्या आहेत त्यावर काम करण्याऐवजी तू वेगळ्याच कामात तुझा वेळ आणि बुद्धी वापरतेयस. लहानपणीची काही स्वप्नं अपूर्ण रहातात, पुस्तकं वाचायची रहातात, चित्रपट बघायचे राहून जातात, अनुभव घ्यायचे रहातात, मग आता जेव्हा वेळ आहे तेव्हा त्यांच्यावर काम करायला काय हरकत आहे?”

आता मात्र, नंदाला, कबीर काय म्हणतोय, याची थोडी थोडी कल्पना यायला लागली. मला ‘इंटिरियर डिझायनिंग’, ‘फुलांची रचना’, ‘पुस्तक वाचन’ करायचंय, शिकायचंय आणि त्यावर काम करण्याऐवजी, मी मात्र मैत्रिणींबद्दल गैरसमज करून घेण्यात वेळ घालवतेय आणि कियाराचं डोकं खातेय.

“पण कबीर, हे वाटतं, तितकं सोपं नाही रे, कसं सर्व एकदम बदलू मी?”

“सगळं नाही, तीनच गोष्टी आणि त्यांना मी ‘तीन क्ष’ म्हणतो. पुढचे तीन आठवडे त्यावर काम करायचं आणि जर या बदलामुळे तुला आनंद आणि सुख मिळणार असेल, तर मग त्या सुरू ठेवायच्या. पहिला क्ष आहे ‘लक्षाचा’. रोज स्वतःच्या अपूर्ण स्वप्नांवर, इच्छांवर काम करायचं. ते करत असताना, दुसरीकडे कुठंही लक्ष द्यायचं नाही. त्यावर काम करण्याचा पूर्ण आनंद घ्यायचा. दुसरा क्ष आहे दक्षमधला. आपले विचार दुसऱ्यांबद्दल भरकटायला लागले ना की त्यांना परत आपल्या स्वप्नांवर आणायचं. त्यासाठी योगसाधना, प्राणायाम सुद्धा करायचा. आणि तिसरा क्ष आहे मोक्षाचा. असं समजायचं, की आपल्याला मोक्ष मिळाला आहे, म्हणजे आपल्यावाचून कोणाचं अगदी कोणाचंही काहीही अडणार नाही आणि म्हणून, अगदी निकडीची गरज असल्याखेरीज कोणालाही त्रास द्यायला जायचं नाही. जे अनुभव घ्यायचे आहेत ते स्वतः घ्यायला सुरुवात करायची, कोणावरही अवलंबून न रहाता. या प्रवासात कोणी आपल्याबरोबर आलं तर चांगलंच, जमेल ना?”

“नक्की, अरे तू तर मीच विसरलेल्या माझ्या स्वप्नांना प्राधान्य द्यायला आणि त्यातला विसरलेला आनंद घ्यायला शिकवलंस. ” नंदा मनापासून हसली, तिला एक वेगळीच दिशा मिळाली होती. “चल, येते आता, खूप काही करायचंय. तुझी फी?”
“तुझ्या आवाजातल्या उत्साहाने, आणि चेहऱ्यावरच्या आनंदाने फी मिळाली.” कबीर म्हणाला.
नंदाने कियाराला फोन केला. “तुझं काम झालं का?”

“अजून नाही ग मम्मा, एक तास लागेल.” कियाराचा आवाज कापरा होता, आता मम्मा नक्की चिडणार असा तिचा होरा होता.
पण नंदाच्या उत्तराने ती चकितच झाली. “नो प्रॉब्लेम, मी तेवढ्यात ‘मिसळ आणि मोका’ला भेट देऊन येते, तुझ्यासाठी काही आणू का? ”
“अगं नको, पण त्यापेक्षा मीच भेटीन तुला तिथे, चालेल?”
“हो, भेटू या ना.”

नंदा निघाली, पण आता तिला एकदम हलकं वाटत होतं, खूप दिवसांनी तिला मनातून, शांत आणि आनंदी, वाटत होतं कारण आता हा आनंद दुसऱ्यांवर अवलंबून नव्हता, स्वतःची शक्ती, कृती, आणि मती यावर अवलंबून होता आणि हा दृष्टिकोनातील सकारात्मक बदलच तिच्या आनंदाचं गुपित होतं.

कबीरने कियाराला फोन केला, “तीन क्ष आता तिला नक्की तिच्या अपूर्ण स्वप्नांवर काम करायला लावतील आणि आयुष्य मार्गी लावतील. तू सुद्धा त्यावर काम करू शकतेस”. आणि दोघंही हसले.





रत्नांगी निलेश मालपेकर

# मुंबई लोकल ९.१९ : गर्दीत घडलेली आयुष्यकथा

अस्वीकरण (Disclaimer):
हा लेख एका मुंबईकराच्या दृष्टिकोनातून घडलेल्या काही घटनांवर आधारित असलेला एक काल्पनिक लेख आहे. घडलेल्या वास्तविक घटनांशी साधर्म्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**सकाळची** ९.१९ ची लोकल म्हटलं, की पहाटेचं लवकर उठणं आपसूकच आलं. घाईघाईत आवराआवरी उरकली, की स्वयंपाकघराच्या टेबलावर आईच्या हातचा आयता, कडक चहा आणि त्यासोबत खमंग, चवदार नाश्ता तयार असायचा. घराबाहेर पडताना आई-बाबांचे मायेचे, काळजीने ओथंबलेले शब्द कानावर पडायचे—
“सावकाश जा... नीट जा... ऑफिसला पोचल्यावर फोन कर.”
मी नजरेआड होईपर्यंत ते दोघं बाल्कनीत उभे राहायचे. त्यांच्या चेहऱ्यावरची दडलेली चिंता दिसली, की मन क्षणभर भरून यायचं. पण वेळेच्या पुढे धावणाऱ्या ९.१९ ची लोकल पकडायच्या ओढीने मी त्या मोठ्या ब्रिजकडे झपाझप पाऊलं टाकत, प्लॅटफॉर्मवर ट्रेनसाठी सज्ज उभी राहायचे.



सकाळची ९.१९ ची लोकल कायमच प्लॅटफॉर्म क्रमांक पाचलाच लागायची. जलद लोकलसाठी ओळखला जाणारा हा प्लॅटफॉर्म पहाटेपासूनच गर्दीने फुलून जायचा. ट्रेन येण्याआधीच प्रवाशांची गर्दी तुडुंब भरलेली असायची. प्रत्येकाची नजर येणाऱ्या गाडीच्या दिशेने खिळलेली, प्रत्येक क्षण मोजणारी. दूरवरून ट्रेनची चाहूल लागताच वातावरणात एकच लगबग उसळायची. लेडीज डब्यातील बायका सज्ज व्हायच्या—कोणी पदर नीट खोचायची, तर कोणी ओढणी सावरायची. हॉर्नचा तीव्र आवाज होताच ट्रेन वेग कमी करत प्लॅटफॉर्मवर येऊन थांबायची आणि पुढच्या काही सेकंदांत झपाझप चढणाऱ्या प्रवाशांनी डबा अक्षरशः भरून जायचा.

मुंबई लोकल म्हणजे अनुभवांची अखंड मालिका. कधी आनंदाचे, कधी वैतागाचे, तर कधी अंगावर शहारे आणणारे प्रसंग इथे रोजच घडत. अपघात, मुसळधार पावसामुळे खोळंबलेला प्रवास, लेडीज सीटवरून होणारी जोरदार भांडणं—हे सगळं नेहमीचंच. पण कधी कधी, याच गाडीत एखाद्या बाईला अचानक काही अडचण आली, की सगळ्या बायका मदतीसाठी धावायच्या. त्या क्षणी दिसणारी माणुसकी नेहमीच थक्क करून जायची.

आमच्या ९.१९ च्या डब्याचा एक अलिखित नियमच होता—वृद्ध किंवा आजारी व्यक्ती दिसली, की आपोआप सीट द्यायची. काही बिघडलं, की एकमेकांसाठी उभं राहायचं. या रोजच्या प्रवासात कधी मैत्रीचे असे ऋणानुबंध जुळले, ते आमचं आम्हालाच कळलं नाही.

कधी गाडीत धमाल रंगायची—हळदी-कुंकू, गाण्यांची अंताक्षरी, विनोद, पत्ते, तर कधी ध्यानसाधना किंवा गंभीर विषयांवर चर्चा. या गप्पांमध्ये एक तास कसा सरून जायचा, ते कळायचंच नाही.

पण रोजच्या या नेहमीच्या प्रवासात असा एखादा भयानक दिवस येईल, याची कल्पनाही केली नव्हती.

११ जुलै २००६—तो काळा दिवस आजही मनात तितक्याच तीव्रतेने जिवंत आहे. जणू काळच आमच्यासमोर उभा ठाकला होता. त्या दिवशी कर्मधर्मसंयोगाने मला घरून निघायला थोडा उशीर झाला आणि माझी ९.१९ ची लोकल चुकली. शेवटची जलद लोकल चुकल्यामुळे दिवसाची सुरुवातच अस्वस्थतेत झाली. दुसऱ्या स्लो ट्रेनने जाण्याचा प्रयत्न केला, पण तीही प्रचंड उशिराने येत होती. अखेर परत घरी जाण्याचा निर्णय घेतला. बॉसला खरी परिस्थिती सांगून ऑफिसला सुट्टी टाकली. घरी पोहोचताच आई-बाबांचे अश्रू अनावर झाले. त्यांच्या डोळ्यांतली भीती पाहून मी अधिकच घाबरले. नेमकं काय झालंय, काहीच कळत नव्हतं. टीव्हीवर बातम्या पाहिल्या आणि पायाखालची जमीनच सरकली. गर्दीच्या वेळेत प्रवासी गाड्यांमध्ये झालेल्या भीषण स्फोटाच्या बातम्या सतत झळकत होत्या—धुराने भरलेले डबे, रक्ताने माखलेले प्लॅटफॉर्म, रडणारे चेहरे... मन सुन्न झालं.

दोनशेहून अधिक लोक मृत्युमुखी पडले होते आणि असंख्य जखमी मृत्यूशी झुंज देत होते. त्या गाड्यांमध्ये ९.१९ गाडीचा ही समावेश होता, हे कळताच मन अक्षरशः कोलमडून पडलं. शरीर घरी सुरक्षित होतं, पण मन त्या डब्यात अडकून पडलं होतं. आज मी त्या गाडीत असते तर...? हा प्रश्न सतत छळत राहिला. प्रत्येक फोन कॉल, प्रत्येक नाव, प्रत्येक बातमी भीतीची नवी लाट उभी करत होती.

आणि मग ते कटू सत्य समोर आलं—माझ्या जिवलग मैत्रिणींपैकी दोन जणी त्या स्फोटात कायमच्या निघून गेल्या होत्या. शब्द संपले. अश्रू वाहत राहिले. पण वेदनांना कुठेच वाट मोकळी मिळत नव्हती. रोजचा प्रवास, हसणं-खेळणं, दु:ख-सुख वाटून घेणाऱ्या त्या मैत्रिणी क्षणात आयुष्यातून निघून गेल्या होत्या.
रिकाम्या सीट्स, न बोललेली वाक्यं, अपूर्ण स्वप्नं—सगळंच मनावर खोल जखम करून गेलं. ही जखम कधीच भरून निघणार नव्हती; तिने फक्त सहन करण्याची ताकद दिली.

त्या दिवसानंतर प्रत्येक लोकलचा प्रवास भीतीसोबतच सुरू झाला. गर्दीत उभं राहिलं, की मन नकळत दरवाज्याकडे धाव घ्यायचं. एखादा आवाज झाला तरी काळजाचा ठोका चुकायचा. आयुष्य क्षणभंगुर आहे, हे त्या दिवशी केवळ उमगलं नाही, तर अनुभवलं गेलं.
आणि आयुष्यभर त्या मैत्रिणींची उणीव, प्रत्येक ९.१९ च्या प्रवासात, प्रत्येक प्लॅटफॉर्मवर, शांतपणे मनाला चिरत राहिली. मी रोज घराबाहेर पडताना आई-बाबांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या काळजीमागचं खरं कारण मला त्या दिवशी उमगलं. पण शेवटी आयुष्य पुढे नेणं एवढंच आपल्या हातात असतं, नाही का? आनंदासोबत दु:खाचे प्रसंग अनुभवणं हीच तर आयुष्याची खरी कसोटी आहे.

आज मी गेली काही वर्षे अमेरिकेत स्थायिक आहे. आधुनिक एसी ट्रेन, बदललेली वाहतूक व्यवस्था आणि वेगळी जीवनशैली यामध्ये ९.१९ ची लोकल आज अस्तित्वात आहे की नाही, हे मला माहीत नाही. पण त्या डब्यात घालवलेले क्षण—सुखाचेही आणि दु:खाचेही—माझ्या आयुष्याच्या शिदोरीत कायमचे साठवले गेले आहेत.

कारण शेवटी आम्ही मुंबईकर आहोत. कितीही संकटं आली, तरी मुंबईकरांची स्पिरिट आम्हाला कधीच स्वस्थ बसू देत नाही. ती आम्हाला पुन्हा उभं राहायला शिकवते... आणि पुढे चालत राहण्याचं बळ देते.



**वृषाली अणावकर**

# A pilgrimage from Chappan to Sarafa-Indore

**We** were in Indore—the city that has won the "cleanest city" title so many times that the trophy probably pays municipal taxes here. But beyond spotless streets and obedient garbage bins, Indore's real religion is food. Indorkars don't just eat—they breathe namkeen, dream of chutney, compose poetry about poha, and probably solve global conflicts over midnight jalebi diplomacy. Our arrival, however, was less poetic and more Bollywood-interval drama. The flight was delayed by eight hours, and by the time we landed, we were a slightly grumpy delegation powered only by airport peanuts and fragile optimism. But the mood melted the moment we stepped outside. Smiling faces, helpful drivers, clean glowing roads, temples lit like postcards, and shops buzzing with customers—Indore looked permanently dressed for a festival. First stop: the legendary Chappan. Fifty-six shops, one universal mission—feed the world. Garadu sizzling on iron tavas like it had a fiery personality, tossed in masala that could wake up a sleeping appetite. The bhutte ka kis was like a warm winter hug—grated corn slow-cooked in milk, butter, and spices, soft enough to melt before you even decided to chew. Jalebis glowed like edible gold bangles, crisp outside, syrupy inside, practically singing, "Eat me before I cool down." And then came the iconic Johny Hot Dog—simple bun, spicy potato filling, secret masala—proof that globalization tastes best when dipped in Indori chutney. We drifted from stall to stall like "serious food researchers"—except there was no research and absolutely no discipline. One ordered nimbu crush, another grabbed a plate of kanji vada, someone else insisted on sonpapdi "just for tasting," which in Indore means at least three bites each. Just when we thought our stomachs had signed a peace treaty, Indore introduced us to its night-shift superstar: Sarafa Bazaar. By day, Sarafa is a 300-year-old jewelry market near Rajwada, where gold and silver sparkle under polite bargaining. But after 9 PM, the jewels go to sleep and the jalebis wake up. The same lanes that sell diamonds by day serve deep-fried happiness by night. Here, the food felt almost ceremonial. The famous dahi wada was a soft cloud drowning in sweet yogurt and tangy chutneys. Fariyali khichadi looked humble but tasted like comfort itself. Kachoris cracked open with a dramatic crunch, releasing


spicy secrets. Jalebi with rabadi felt less like dessert and more like a romantic relationship—rich, intense, and impossible to forget. Mawa bati, soaked in syrup, tasted like a sweet confession. Coconut patties and ghee-soaked ghevar completed the parade of indulgence. Every stall had a crowd, every plate had a story, and every bite quietly erased the memory of our eight-hour delay. That's Indore's magic. In one evening, we visited two markets—one for gold, one for ghee—and somehow, both felt equally precious. And perhaps that's the deeper lesson Indore serves on a steel plate: Life, like a plate of jalebis, is best enjoyed while it's hot, imperfect, and shared with smiling strangers. Clean streets are good, clean hearts are better—but a warm plate of food at the right moment can fix almost everything. Because diets can wait, flights will always be late, but a perfect jalebi never returns once it's gone. Kal ho na ho... jalebi aaj kha lo.









**Rajeev Gokhale**


## लगीनघाई

**आज** वसंतोत्सवाची सुरुवात बघण्यासाठी सिंहगडाच्या जंगलात गेलो होतो.

अजून वसंत प्रकटलेला दिसला नाही, तरी सगळ्या सृष्टीची लगबग मात्र अगदी जोरात सुरू झालेली आहे.

घरात लग्नं ठरलं, की करवल्या जशा अगदी ठरल्या दिवसापासून नटून थटून बसतात, त्यांच्या मनात आत्ता नवरदेव आपल्या घरी येईल, मग नवरदेव घरी येईल, अशी सततची हुरहूर अगदी दिवसरात्र लागून राहिलेली असते आणि त्या त्याच्या स्वागताला अगदी सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत नवे कपडे घालून, नट्टापट्टा करून अगदी तयारीत असतात; अगदी त्याचप्रमाणे पिवळी कण्हेर आणि धायटी अगदी नटून थटून वसंताची वाट बघत बसल्या आहेत.

बाकी घरातल्यांची तयारी अगदी लगबगीने सुरू झालेली आहे. कावळ्यांची घरटी अर्धीमुर्धी बांधून तयार आहेत, दयाळ इकडून तिकडे आणि तिकडून इकडे शीळ घालत फिरत आहेत. त्यांचीही नव्या नवरीबरोबर नवा संसार थाटण्याची अधीरता अगदी लक्षात येते आहे.



गाणारा बुलबुल सध्या गाणं विसरून कामाला लागला आहे, उद्या तीन चार पोटं भरून नंतर आपलंही पोट भरेल अशी झाडं आणि किडे मुंग्यांच्या वसाहती तो आत्ताच शोधून ठेवतो आहे.
शिपाई बुलबुल आणि राजा बुलबुल झाडांची छोटी उंबरं छोटी छोटी फळं बुक करून ठेवत आहेत.

सगळे लगबगीत आहेत पण धांदल मात्र कुणाचीही सुरू नाहीये कारण वसंत अजूनही कुठेच दिसत नाहीये. अगदी बारकाईने बघितल्यावर एका रानजाईला शेंड्याला थोडासा दिसला पण तो फसवाही असू शकतो.
आठवड्याभरात मस्त सोनेरी लाल चमकदार असं जावळ थोडं थोडं उगवलेलं दिसेल आणि बघता बघता सगळं जगच त्या कोवळीकीने भरून जाईल.

असा सगळा जामानिमा घेऊन वसंत आला, की शेजारचा कोकिळ कधी नव्हे तो आपले गाण्याचे क्लासेस सुरू करेल, न जाणो वासंती आपल्याच गाण्यावर लट्टू झाली तर तेवढीच लग्नाची संधी मिळून जाईल असा लबाड विचार त्याच्या मनात डोकावून जात असावा. अगदी वासंती नाही तर नाही एखादी करवली तरी आपलं गाणं ऐकेल अशी वेडी आशा घेऊन तो गात राहतो आणि आपलं घरटं बांधायचं विसरून जातो.

अशी सगळी लगीनघाई बघायला जंगलात नुसती धमाल येते आहे.

कैरीबाई सगळी तयारी करून बसल्या आहेत, नवरा मुलगा आला, की पटकन केशरी ड्रेस अडकवायचा आणि लताबाईंच्या गाण्याच्या लकेरीसारखी आपली मोहक गंधाची लकेर घेऊन नवऱ्या मुलाचं लक्ष वेधून घ्यायची ट्रिक त्यांनी ठरवली आहे.

जांभूळनाना सुद्धा तुरट चव तयार करून बसले आहेत, नवरा मुलगा आला रे आला, की आपली गोडी त्यात ओतून थेट त्याच्यासमोर अंगणातच सडा पाडण्याचा त्यांचा मानस आहे. घरातली छोट्यांची गँग ज्याप्रमाणे नवा पाहुणा येताना दिसला रे दिसला, की मुद्दामहून त्याच्या अंगावरच सिक्स मारून शायनिंग करते आणि स्वतःचे अस्तित्व दाखवून देते, अगदी तसाच काहीसा बेत या जांभूळनानांचा आहे.

चिंच आणि आवळी बिचाऱ्या एकमेकींशी गुपचुप आतल्या आवाजात गप्पा मारत बसल्या आहेत. कुणाच्या मनात काय काय चाललं आहे? याची अगदी हळू आवाजात चर्चा चालू आहे. नवऱ्या मुलीचे खरे जवळचे आम्हीच कसे आहोत हे त्या एकमेकींना सांगत आहेत. एवढ्या सगळ्या भरजरी महोत्सवात नवरा मुलगा आपल्याकडे कशाला बघेल? आपल्याकडे कुणी का लक्ष देईल? आपलं काय महत्व? असा काहीसा प्रॅक्टिकल पण निराशेचा त्यांचा सूर आहे.

पण नवरदेव सुद्धा रसिक आहे, त्याला घरातल्या सगळ्यांची मानसिकता कळली आहे. कुणाची खबर ठेवायची आणि कुणाकडे दुर्लक्ष केल्यासारखं दाखवायचं याची त्याला अगदी व्यवस्थित जाण आहे. येताना तो चिंचेला आणि आवळीला छान चविष्ट कोवळी पानांची साडी आठवणीने घेऊन आला आहे, दोघीही बिचाऱ्या त्याने आवर्जून ठेवलेल्या आठवणीने गाभुळल्या आहेत आणि थेट त्याच्या जेवणाच्या ताटाची चव श्रीमंत करण्यात मनापासून मग्न झाल्या आहेत.

ही अशी लगीनघाई बघायला फार भाग्य लागतं.
चला, कधी येताय?

आपणही या समारंभात शरीक होऊन जाऊयात.



**विनय भालेराव**

## अजरामर

“**आयेगा** आयेगा आनेवाले आयेगा .....

आई : विद्याधर, अरे पोहे आणि चहा गार होतो आहे अरे... लक्ष कुठे आहे तुझं? आज त्या संगमनेरकरांना काय ठरले तुमचं, ते कळवायचे आहे. तुला आवडली का त्यांची लेक? अहो, तो रेडिओ बंद करा आधी. आनेवाले आलेले आहेत. हा घ्या तुमचा गरम पाण्याचा ग्लास.

विद्याधर : “बाबा, अहो आजची बातमी वाचलीत का? काय चाललं आहे या जगात ? दोन दिवस उसंत मिळत नाही. आज काय तर अमुक देशाने तमुक देशावर तोफ ताणली व आपल्या सगळ्यांना विमान प्रवास जीवघेणा होतो की काय, असे विचार मनात येऊ लागले. त्या आधी जागतिक व्यापार कसा होणार या विचाराने महागाई वाढली आता पेट्रोल महागले व प्रगत असून चूल पेटवावी लागली. सामान्य माणसाने जगावे का ? का जगावे?

बाबा : अरे विद्याधर असे टोकाचे विचार नको. अनेक जन्म मानवाने एक मेकांवर हल्ले चढवले आहेत पण तरीही मानवजात आपली तग धरून उभी आहे.

आई : अरे, तुझ्या जन्माच्या आधी भारत युद्धात उतरले होता.. त्यावेळेस तू माझ्या पोटात होतास. तुझे बाबा इंडियन ऑइल मध्ये. आम्ही दोघे डेपोच्या परिसरात राहायला होतो. काही हमला होईल माहीत नसायचे. तरीही तुझा त्याग करावा असे कधी वाटले नाही. उलट तुझ्या संरक्षणासाठी, त्या नवीन जीवनासाठी कुठलीही धडपड करण्यास आम्ही तयार होतो.

बाबा : विद्याधर असे अनेक वारे येतात आणि जितक्या पटकन आले तितक्या पटकन पसार होतात. रोज वर्तमान पत्र काही ना काही दुर्घटना नमूद करतच असते, म्हणून काही आपण जगणे सोडायचे का?

विद्याधर : बाबा तुम्हाला म्हणणे सोपे आहे .... या रोजच्या घडामोडींनी माझं ऑफिसचं ट्रॅव्हल स्ट्रेसफुल केले आहे. पेट्रोलची लाईन, सिग्नलची गर्दी, उन्हाची तीव्रता, पोल्युशन, त्यावर सर्वत्र चालणारे कोपऱ्याकोपऱ्यावर चालू कन्स्ट्रक्शन यांना रोज झुंज देत देत कशीबशी मी ऑफिसची वेळ गाठतो.

बाबा : अरे प्रगतिपथ हा विविध रंगी असते. वेगवान गतीसाठी थोडी मेहनत मजुरी आणि सबुरी लागते. आधी आईच्या प्रश्नाचे उत्तर दे, नाही तर तुला माहीत आहे इथून तुझी सुटका नाही.

विद्याधर : आई अग, काय सारखा तोच प्रश्न विचारतेस? इथे माझीच शाश्वती नाही असे वाटते आहे. मला तर वाटते की या अनैतिक वातावरणात सगळं काही संपुष्टात येणार आहे. मरण पावलोपावली उभं असताना का मी नवीन जीवन या धरेवर आणू? तुम्हीच दोघे सांगा मला एक नवीन जीवाला मी या stressful वातावरणात आणून काय मिळणार मला किंवा तुम्हाला?

आई : अरे stress घेतला तर आहे आणि नाही घेतला तर नाही. तो प्रत्येक जण आपापल्या मते ठरवतो

विद्याधर : आई, जरी मी तुझे म्हणणे मानले तर मोस्ट इम्पॉर्टन्ट गोष्ट हीच आहे, की सगळं जीवन शेवटी अंत गाठते. मरण हे निश्चित आहे तर का ह्या जीवनाचे उतार चढाव बघावेत? शेवटी सगळं सोडून जायचं तर मग जमवायचंच का?

बाबा : अगं कला, तुला इम्पॉर्टन्ट काय ते कळले ना. आता मी म्हणतो ते पटले ना तुला. माझे सासरे आहेत ह्याच्या रूपात. कोथळा काढणार नेहमी.

विद्याधर: बाबा काही पण काय? आजोबा आणि मी वेगवेगळ्या व्यक्ती आहोत. त्याचा माझ्याशी काय संबंध.

बाबा: पहा पहा कला, प्रत्यय मिळाला तुला

आई: विद्याधर, तुझ्यातल्या माझ्या स्वर्गीय बाबांना नमन.

विद्याधर: आई, तू पण believe करतेस का या सगळ्या supernatural गोष्टी? तू तर विख्यात सायंटिस्ट आहेस मग हे कसे म्हणतेस?

आई : विद्याधर अरे genetics आहे ते. बाबा तसे बोलतात कारण शैली आहे ती. प्रत्येक जण आपापल्या पद्धतीने संवाद साधतात. बाबा अशा शैलीत बोलतात. ते काही अवहेलना करत नाहीत माझ्या बाबांची किंवा तुझी. माझे बाबा हे फार प्रॅक्टिकल भाषेत बोलायचे. स्वतः डॉक्टर होते त्या मुळे core of the matter या शैलीत बोलायचे. अर्थात मुद्देसूद बोलणे ही त्यांची शैली. वायफळ मुद्दे ते मांडत नसत आणि कोणी काही विचारले तर डायरेक्ट आहे ते सत्य सांगत. कधी कधी ते कडू सत्य कठीण जाते ना समजायला. तू त्या शैलीत बोललास म्हणून बाबा तुला आजोबा म्हणाले.खरं तर तुझ्या बाबांची किंवा माझी तशी बोलण्याची पद्धत नाही. मग तू कुठून शिकलास तसे बोलणे?

विद्याधर : आई, माझा प्रश्न चुकला आहे असे वाटते का तुला?

आई : अजिबात नाही. मी वेगळ्या प्रकारे मार्गदर्शन करते. बघू तू कुठपर्यंत पोहचतोस. विद्याधर हा जीव किंवा देह हा माझ्या ‘X’ व बाबांच्या ‘Y’ chromosomes ने एकत्र येऊन तयार झाला. बरोबर? सायन्स आहे ते. म्हणजे विद्याधर हा ५०% आई अधिक ५०% बाबा. अर्थात survival of the fittest लागू आहे. आमच्यातले जे उत्तमोत्तम ते तुझ्यात उतरले. वर्ण तुझा माझ्यासारखा पण अंगयष्टी बाबाची. केस माझ्यासारखे दाट तर बोटे बाबासारखी नाजूक व लांब. तसेच स्वभाव पण. माझ्यासारखा झुंज देणारा आणि बाबांसारखा संवेदनशील. त्यांच्यासारखं न सांगता तुला समजून घेता येतं, की कोणाला काय हवं आहे. मग हा मुद्देसूद संवाद हा माझ्या X मधून आला आहे. माझ्यात डॉमिनन्स नाही पण तुझ्यात

आला तो गुण. कसा ? कारण माझा X हा ५०% आजी आणि ५०% आजोबा यातून तयार झाला आहे. अर्थात बाबा म्हणतात ते scientifically खरे आहे. २५% आजी आणि २५% आजोबा तुझ्यात आहेत.

बाबा : विद्याधर, अरे नीघ आता ऑफिसला नाही तर उशीर होईल.

विद्याधर : हो. आई मला पोहे डब्यात देतेस का?

मी रिक्षेत बसून विचार करू लागलो. एकात एक गुंतलो आहोत आपण. मी २५% आजी व आजोबा तर १२.५%पणजोबा आणि ७.२५% खापर पणजोबा आणि ३.१२५% खापर खापर पणजी आणि १.५६२५% खापर खापर खापर त्याच्या खोलात गेलो तर सातवी पिढी मी गाठली. अर्थात सात पिढ्या ही म्हण का प्रचलित आहे, ते मला कळले. माझे Genetic Composition सात पिढ्यांपर्यंत बलवत्तर आहे. त्यानंतर ते अंशात्मक असल्याने माझ्यात ते गुण आढळण्याची शक्यता कमी. Wow आई तू खरंच Genius आहेस. माझे स्वभाव व देहास असणाऱ्या व्याधी हे माझ्या पश्चात पुढच्या सात पिढ्या अनुभवूशकतात. म्हणून डॉक्टर नेहमी वंशावळीत असणाऱ्या आजारपणाची माहिती घेतात.

पण मी अजून मागे जाऊ शकतो. अंशात्मक का असेना, मी माझे कुळ व त्याचा उगम गाठू शकतो. आणि तीच दोरी धरून चालत गेलो तर माझे गोत्र अर्थात व त्याही पलीकडे सप्तर्षी व त्याही पलीकडे मनू - ज्यातून मनुष्य जातीचा उगम मानला आहे तिथपर्यंत पोहोचू शकतो. तसे पहिले तर मी अमर नाही, अजरामर आहे.

रिक्षावाला : दादा आले तुमचे हापिस. काय मरणाची गर्दी आहे रस्त्याला. तरी आणलं मी तुम्हाला वेळेत.

विद्याधर : हो रे दादा. अजरामर आहोत रे आपण सगळे. अजरामर!



**सुलक्षणा कुलकर्णी**

# माझा सखा!

(छोटे प्रहसन)



श्रीकृष्ण गोविंद हरे मुरारी
हे नाथ नारायण वासुदेवा

माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे मोबाईलवर भजन ऐकत होते तेवढ्यात...

मी : (व्यत्यय आल्याने त्रासिकपणे) कोण आहे?

दारावरची व्यक्ती : मी काऊ आहे.
(मी त्या उत्तराकडे लक्ष न देता अनयला जेवण भरवण्याचे चालू ठेवले) ठक ठक ठक ऽऽऽऽ

मी: (जरा चिडूनच) अरेऽऽऽ कोण आहे? मी कामात आहे, काऊ का कोण आहे त्यांनी थांबावे एक मिनिट.

हात धुऊन दार उघडले, तर एक सावळ्या रंगाचा पण तेज:पुंज पीळदार शरीराचा रुबाबदार माणूस दिसला.

मी : (जरा त्रासून) कोण पाहिजे आपल्याला?

काऊ: (शांतपणे आत्मविश्वासपूर्ण) मला थोडे बोलायचे होते तुझ्याशी.

मी टरकलेच जरा.

काऊ : ( हसत) तोपर्यंत माझ्याबरोबर आणलेल्या विटेवर उभा राहतो.

मी : (आश्चर्याने) अरे बापरे! काय? पांडुरंग!! चुकीच्या घरी आलास. मी नामदेव नाही. तुम्ही कोण आहात ते सरळ सांगा बरे. नाही तर मला नाईन वन वन ला कॉल करावा लागेल.

काऊ : (शांतपणे पण ठाम आविर्भावपूर्ण) मी श्री भगवान. तू भगवद्गीता वाचतेस ना त्यातील श्रीकृष्ण!
मला चक्कर येण्याची बाकी होती.

मी : ( स्वतःला सावरून) तू भगवान श्रीकृष्ण असेल पण मी काही कुब्जा नाही. चुकीच्या पत्त्यावर आलास.

काऊ हसायला लागला हे ऐकल्यावर. काऊकडे दुर्लक्ष करून मी अनयला जेवण भरवणे पूर्ण केले. त्याला खेळायला खेळणी देऊन परत काऊ नामक इसमाकडे वळले.

मी : (चिडून) चेष्टा मस्करी बस झाली.

काऊ : (शांतपणे) तुला मी १९८७ सालापासून पाहतो आहे तुझी गीता पठणाची आवड .
पुण्याच्या भारत हायस्कूलमधील वैद्यबाईंच्या गीतेच्या कॅसेट्स दर पौर्णिमेला ऐकायचीस. पुढे त्या बदलीच्या गडबडीत गहाळ झाल्यावर तू गीतेच्या पुस्तकातील अठरा अध्यायांच्या श्लोकांचा अर्थ जसा वेळ मिळेल तसे वाचायचीस. तुझ्या या तपश्चर्येला म्हणूया, सत्कर्मी भावांनी श्री. गोविंदानंद सरस्वती न्यासातर्फे ऑनलाईन गीता वर्ग शिकवण्याचा विडा सौ. रेखा उटगीकर यांनी उचलला. आई बाळाला शेजारी बसून शिकवते याप्रमाणे तू मन लावून सर्व ग्रहण करून आत्मसात करताना मी पाहत असे. व्हॉट्सॅपवर पुढचे श्लोक कधी लोड होतात त्याची तळमळ. तू पाठ करण्याचा प्रयत्न केलास पण जमले नाही. थोडी हिरमुसलीस पण २६ जुलै २०२४ च्या आषाढी एकादशीपासून रोज गीता पठण करायचा निश्चय केलास. ज्या दिवशी जमत नसे त्यादिवशी तू ऑडिओ क्लिप श्रवण करायचीस.

मी : (चेहऱ्यावर आश्चर्य) बापरे! खरंच तू श्रीकृष्ण आहेस!! विश्वास बसत नाही या गोष्टीवर. मी स्वतःला खूप भाग्यवान समजते. रेखाताईंनी पाणिनी व्याकरणाप्रमाणे सुंदर गीता शिकवली. मला पाठांतर अर्थ समजून करायची खूप इच्छा होती. म्हणून youtube वर शंकर अभ्यंकर, वामनराव पै, गौर गोपालदास महाराज, स्वामी मुकुंदानंद यांचे अर्थ विवेचनाचे व्हिडिओ पाहिले. पण ते तुझ्या मनाला भिडत नव्हते...
( माझे वाक्य तोडत)
काऊ : परत एक चमत्कार झाला तुझ्या आयुष्यात. बरोबर? न्यासातर्फे ऑनलाईन अर्थ विवेचनाच्या उपक्रमाची धुरा, संस्कृती हिरवाडकर यांनी हाती घेतली.

मी : (उत्तेजित होत) त्यात ओलावा आहे. श्लोकांचे अर्थ त्या इतक्यात तन्मयतेने सांगतात, की त्यांचा तास कधी संपूच नये असे वाटते. त्यांची अध्यात्म आणि व्यवहार यांची जोड लावण्याची हातोटी उल्लेखनीय आहे.

काऊ : (जरा कंटाळून) आणि हे सर्व नि:शुल्क चालू आहे. हे मला माहीत असलेले काय सांगतेस! तुझ्या मनात प्रश्नांचं काहूर माजलं आहे ना! मग ते विचार ना!

मी : (उत्तेजित होत) तुम्हा देवदेवतांचे कोडे उलगडत नाही. तुमचे दर्शन घ्यायचे असेल तर खूप साऱ्या पायऱ्या चढाव्या लागतात. दूर दूरपर्यंत जावे लागते. अष्टविनायक, बारा ज्योतिर्लिंग... विचारूच नकोस! ती नर्मदा परिक्रमा काय सर्व कठीणच असते. आता पहा तुझी गीता! ती पण संस्कृतमध्ये...

काऊ : (माझे वाक्य तोडत) ज्ञानेश्वरांनी लिहिलेली ज्ञानेश्वरी, विनोबांनी लिहिलेली गीताई, हे वाचण्याचा प्रयत्न का नाही केलास?

मी: (शरणागतीच्या आविर्भावात) हो रे बाबा! का कुणास ठाऊक मला भगवद्गीतेमध्ये रस होता. पहिल्यापासून ते लयबद्ध उच्चार मला मेस्मराईज, मंत्रमुग्ध करतात.
( लाडिकपणे) पण तसा तू कनवाळू आहेस. मी मान्य करते बाबा! मी सध्या मदर टॉडलर वर्गामध्ये आहे गीता मुखोद्गत करण्याच्या. बघू कसे जमते ते.

काऊ :(समजुतीच्या स्वरात) कर्म कर फळाची अपेक्षा करू नकोस.

मी : (आत्मविश्वासपूर्वक) तुझ्या कृपेने मुके लोक बोलू लागतात आणि लंगडे लोक पर्वत ओलांडून जातात. तसेच वाळूचे कण रगडिता तेलही गळे, हे घिसेपिटे डायलॉग नको मारूस कृपा करून.

(काऊ मनापासून हसतो.)

तू प्रत्यक्ष दर्शन दिलेस मला खूप हुरूप आला आहे.

काऊ : अगं, काहीतरी विचारेन म्हणत होतीस सारखी. त्याचे काय झाले?

मी : ( हिरिरीने बोलत) गीतेमध्ये सर्व प्रश्नांची उत्तरे दिली आहेस. मग सांगशीलच.

काऊ : नक्कीच! बरोबर आहे ते.

मी : (अगतिक होऊन) चित्तशुद्धी, आत्मसाक्षात्कार वगैरे यांचे स्पष्टीकरण श्रुतीताई देतीलच; पण सध्या एक यक्षप्रश्न मला सतावत आहे तो असा, की आपली सत्ता प्रस्थापित करण्याच्या हव्यासापायी तिसरे महायुद्ध येऊन ठेपले आहे. टेक्नॉलॉजी इतकी प्रगत झाली आहे, की तिचा विपरीत वापर होतो आहे. बसल्या ठिकाणाहून मिसाईलचा वापर करून विध्वंस घडवून आणला जातो आहे. भारतात रोजी रोटी कमावणाऱ्या लोकांचे धंदे बंद पडत आहेत. महागाई किती होते आहे याची काही कल्पना आहे का तुला? (संताप व्यक्त करून) का तू बघ्याची भूमिका घेतो आहेस??

काऊ : (श्लोक पुटपुटतो)

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे॥


(काऊ आला तसा निघून जातो.)



**वासवदत्ता पटवर्धन**

# कविता

**कधीच** आपली वाट एक नव्हती
कधीच फिरलो नाही, हातात हात गुंफून.
दऱ्याखोऱ्यात वाट चुकलो नाही
पानापानात उंच घुमत जाणारे पाखरांचे उदास गाणे
कधीच ऐकले नाही व्याकुळ होऊन.
आज आपण एकमेकांचे कोणीच नाही
तरीसुद्धा,
श्रावणातल्या उन्हासारखा अचानक
सामोरा आलास तर
गलबलून येतं माझं काळीज.
वाटतं, एकाकी असशील तूही माझ्याशिवाय.
विसरून जाते, तू मला दुखवलंयस हे ही.
तुझ्यासाठीच वाहत रहातात
हे हट्टी डोळे.
आता सांग, या झपाटलेपणाचं काय करू?
कसे उभारू शेवटापर्यंतचे हे निर्जीव क्षण?
कुठे पुरून टाकू खोल काळजात तुझा संदर्भ?
एकच सांग,
तुझ्यापाशीच रेंगाळून थांबणाऱ्या
या आयुष्याचं काय करू?



**सुजाता महाजन**

# माया

**वादळ** आहे ती
सूर्याचा किरणही तीच
जणू प्राजक्त अलगद उमलते
कधी तणासारखी फोफावते

ती तेजस्वी विद्युल्लता
सावळ्या धरेची ऋजुता
कधी पहाटेचा गारवा,
फुलांतला सुगंध,
कधी रागदारीतला मारवा

ती ललाटरेखा कोरी
मुक्तीचे बीजही पेरी
ती माय, तीच तान्हा
ती वात्सल्य, ती पान्हा
ती रौद्र, ती माया
ती काळीज, तीच काया

ती जगत्जननी, ती कधी अबला
ती व्यक्त-अव्यक्तशी कला
ती विस्तार अफाटसा, ती कधी बिंदू
कथी दवाचा थेंब, कधी सिंधू

कधी सूक्ष्म अंशरूपी अन् अबोध
कधी अनादि, अफाट आणि अगाध.
ती अनिवार्य, ती सर्व शक्यता अनंत.
तीच आदि, उगम आणि तीच अंत.

ती अनाहत नाद
तीच हाक अन् तीच साद
स्वयंभू आहे ती!
माय आहे अन् माया ही ती!!



**श्रद्धा भट**

## कविता

**सावली** घनदाट जेथे त्या दिशेने जायचे
थांबते ही वाट जेथे त्या दिशेने जायचे

तापलेला उन्हाळा रोज आहे सोबती
गारव्याची साथ जेथे त्या दिशेने जायचे

गलबला काहूर येथे भोवती अन् अंतरी
शांततेचा नाद जेथे त्या दिशेने जायचे

रोषणाई एवढी की झाकूनी गेल्या दिशा
तेवणारी वात जेथे त्या दिशेने जायचे

संपली गाऊन सारी नश्वराची गायने
शाश्वताला साद जेथे त्या दिशेने जायचे



**शिल्पा देशपांडे**

# जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं...

**चाकोरीतून** चालताना, अचानक एक वळण येतं
ग्रीष्मातील आगंतुक पावसासारखं, आपल्या आयुष्यात प्रेम येतं..

दाटून आलेलं असतं आभाळ, जेव्हा मळभ साठलेलं असतं
मनाचा कानोसा घेण्यापूर्वीच, प्रेमाचं अंबर फाटलेलं असतं...

कैकदा शोधून जे सापडत नाही, मागूनही कुणा मिळत नाही
असं प्रेम आताच आपल्या वाट्याला का आलं?
हे योगायोगाच्या तर्कापलीकडे कळत नाही...

व्यक्त व्हावे की अव्यक्त रहावे?
डोहात या डुंबावे, की काठावरून अलिप्तपणे पहावे?
संभ्रमित मन अन् सतर्क मेंदू यांची तुंबळ जुंपलेली असते,
ऋणानुबंधाची वीण दैवाने,
आपल्याही नकळत गुंफलेली असते...

घेतल्या जातात हळव्या शपथा,
व्यक्त होतो समर्पणाचा इरादा,
प्रेम यशस्वी होणार का? याला आता महत्त्व नसतं,
सचोटीने साथ देताना, तारण ठेवलेलं स्वत्व असतं...

जरी येती असंख्य अडथळे, ते पार करणं हेच एकमेव ध्येय असतं
मागे फिरणं शक्य असतानाही तसे न करणं
इतकंच दोघांना प्रेय असतं...

उत्कट अशा भावनांचा हिंदोळा, उत्तुंग स्तरावर घेऊन जातो
प्रेमाचा हा अतुल्य जागर, अर्धत्वाने शापित जीवांना पूर्णत्व देतो...

सहजीवनाचं समीकरण सोडविताना, एकमेकांच्या प्रश्नांचा मागोवा घेता
अचानक उत्तर सेम येतं,
जेव्हा आपल्या आयुष्यात प्रेम येतं...

प्रेमात पडणं आणि त्यातून पुढे पूर्णत्व येणं,
नक्षत्रांचं हे देणं, इतकंच या शब्दांमधून सांगणं...



**सौ. स्वप्ना कानविंदे**

(बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या (BMM) वृत्तातर्फे आयोजित काव्यस्पर्धेतील विजेती कविता)

## पुस्तक माझा मित्र

**लहानपणी** झाली ओळख
ह्या अनोख्या मित्राची|
“जीवनभर साथ देईन”
शब्द देत, घट्ट धरले हाताशी||

सुंदर विचारांच्या फुलबागेत
घेऊन गेला सहजची,
सांगत राहिला”वेच आता
फुले सुंदर विचारांची”||

वेळोवेळी सल्ला दिला
“वाग धरून नीतीला|
वेळोवेळी वाचवत राह्यला
होणाऱ्या अधोगतीला||

ह्यानेच तर जागे केले,
सारासार विचाराला
सतत मला मदत केली
उत्तम व्यक्ती व्हायला||

ह्यानेच तर दिशा दिली
व्यर्थ जाणाऱ्या जीवनाला|
वाटचाल करायला शिकवले
ज्ञानाच्या दिशेला||

ह्यानेच तर व्यापले
माझ्या मन आणि बुद्धीला|
आणि शिकवले जगायला
घेऊन सवे सन्मानाला||

मलाही कळले, भावले माझ्या मनाला
इतक्या सच्चा मित्राची मैत्री
नक्कीच भेटवेल मला
सदैव मंगलमय जीवनाला||



**अलका धाराशिवकर**

## *Poem*

**Clouds** of storm gather in a mass of darkness,
looming above the field
A sunflower, searches desperately for some sort
of protection or shield
Branches of white sparks strike the ground
While the sky lets out a raging roar of sound
Waves of shock travel across the plain of land
Rattling the roots of the flower until it can barely stand

A sunflower, wilted and dimmed,
clutching on tightly to its withering leaves
Despite the violent everlasting storm,
the little flower still believes
Believes that this misery of weather is soon pass
Passing to reveal the warmth of sun
against the blades of grass

One last bead of water pitter-patters onto the sunflower
At last this wretched hour of relentless showers
Has finally cowered
And come to end

The sun gently peaked above the land's edge,
lulling the creatures of the night
As the first robin begins its melody,
awakened by the warming rays of golden light
A sunflower, stretches its petals and lets out a yawn
Turning its face towards the soft glow of dawn

**Sanika Surve**

# When the Sky Turned Gray

**I miss** who I used to be.
I miss being full of energy.
Now I'm tired all the time,
sleeping whenever I can just to feel alive.

I miss seeing my friends every day, just playing in the sun,
showing up to their houses unannounced because we had no phones.
I miss playing with the neighborhood kids
and coming home when the streetlights turned on
But that's not the case anymore.

I miss when we were free, when we had nothing to worry about.
I miss the days when adults told us, "Never grow up".
I wish that were true.
Now it's being asked, "Who will you be?" and "What will you do?"

I miss the colors I used to see:
the different shades of green for the grass and the trees,
the endless blue for the sky and the seas
I miss when the world was full of light;
now I watch the color drain into the night.

It's impossible to go back now.
We sit and reminisce, knowing it's all gone.
It's part of life, I suppose– "growing up," they say.
I miss being happy.
I miss seeing genuine smiles,
not the forced ones that fade too quickly.
What happened? Why did we change?

I look at this generation and wonder if they'll ever
experience the kind of fun we had.
Will they know the joy of staying out late?
Will they see how vibrant the world once was?
Or will they grow up with nothing to miss?

We're stuck in a world that's always moving forward,
never looking back,
and we're changing with it.

No one seems to question it.
We're all forgetting the past,
letting go of our youth–
the time we were all truly happy.
But no one talks about that anymore.

Now we're focused on growing up too quickly,
counting down the days until we can drive,
until we can leave home.
This isn't the life we imagined as kids.
We thought we would stay young forever;
at least, that's what adults made it sound like.

Maybe it was their fault that we never learned the truth of
the world.
Or maybe they were just protecting us from it.
I remember thinking about the advantages of growing up,
being free from my parents' rule.
But I'll never be free–
Not the same way I was as a kid.



**Vedika Deshpande**

# व्यंगचित्र






**श्रीकान्त कोरान्ने**
**('थोडं हसलेलं बरं' या व्यंगचित्रसंग्रहातून)**

# सदरे

## शब्दकोडे

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | |
| ७ | | | ■ | ८ | ९ | | ■ | १० | | |
| | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | |
| ११ | | १२ | ■ | १३ | | १४ | ■ | १५ | | |
| ■ | ■ | १६ | | | ■ | १७ | | | ■ | ■ |
| १८ | | | ■ | १९ | २० | | ■ | २१ | | २२ |
| | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ■ | |
| २३ | | २४ | ■ | २५ | | २६ | ■ | २७ | | |
| | ■ | | ■ | | ■ | | ■ | | ■ | |
| २८ | | | | | ■ | २९ | | | | |



अभिजित रायरीकर

**उभे शब्द**

१. असमानता, शत्रुत्व
२. दाणेदार, कणीदार
३. मऊ, मुलायम, बारीक विणीचे
४. कायदा, अट, ठराव
५. भराव, निरनिराळ्या आकाराच्या दगडांचा समुदाय
६. ९३ साली क्रिकेट विश्वचषक जिंकणारा भारताचा कर्णधार
९. ढंग, शैली, धाटणी
१२. शंकराचे वाद्य
१३. सर्वजण, लोक समुदाय
१४. दौड, (घोड्यावरची) सफर
१५. अंगण, परसू
१८. (लग्नात) वाद्य वाजवणारे
२०. लोखंडाचे सोने करणारा दगड
२२. आप्त, नातलग
२४. आलाप, तान
२५. अजागळ, खुळचट, वेडसर
२६. नौबत, मोठा ढोल,चर्मवाद्य
२७. गोल, वर्तुळ

**आडवे शब्द**

१. तत्ववेत्ता, मर्मज्ञ
४. मतदारांनी उमेदवार पसंत करण्याची कृती
७. मृदू, शांत, कोमल
८. जखमेवर लावायचे स्निग्ध औषध
१०. यावनी फलज्योतिषविद्या
११. लग्नाची मिरवणूक
१३. भारी, तीव्र, अवाढव्य
१५. जन्मभराचे
१६. चिंतन, ध्यान
१७. पंतप्रधान
१८ गायीचे पारडू
१९. शीघ्रकोपी
२१. कागदावरचा उभा स्तंभ
२३. तीन पाने असलेले
२५. आवरण, गाठोडे
२७. जंगलात पेटलेली आग
२८. मुलेबाळे असलेला
२९. रसायनाविषयीचे

# गंमत शब्दांची

## पांढरपेशा

**विद्येच्या** किंवा शिक्षणाच्या आधारे नोकरीव्यवसाय करणाऱ्यांना आपण आज पांढरपेशा समाज म्हणतो.

या शब्दाला आपल्या जुन्या ग्रामशास्त्राचा इतिहास आहे. खेडेगावात काळी आणि पांढरी असे  जमिनीचे भेद मानले जातात. महाराष्ट्रात देशभागावरची जमीन काळ्या मातीची आहे. त्यावरून शेती करण्यायोग्य जमीन ती 'काळी' असं मानलं जाऊ लागलं. ( शेतकरी आपल्या जमिनीला 'काळी आई' म्हणतो ते याच अर्थाने.) याउलट जी वस्तीची जमीन ती पांढर किंवा पांढरी. साधारणतः गावठाणाची जमीन ती 'पांढरी' व बाकीची 'काळी' असा असा खेड्यातला प्रकार असतो. शेतकरी 'काळी' वर जाऊन शेती करतो. पण गावात राहणारे थोडे लोक असे असतात, की जे शेतीव्यतिरिक्त अन्य व्यवसाय करतात. ते पांढरपेशा. पुढे शहरांची वाढ झाली आणि तिकडे नोकरीव्यवसाय करणाऱ्यांची संख्या वाढली. तिथल्या मध्यमवर्ग हा पांढरपेशा ठरला. 'महाराष्ट्र शब्दकोशा'त पंढरपेशा या शब्दाचा अर्थ "शेतीव्यतिरिक्त इतर धंद्यावर किंवा पांढरीवर उपजीविका करणारा उपजीविका करणारा, समाजातील उच्चवर्णीय म्हणून मानला गेलेला लेखक, वकील, शिक्षक, ब्राह्मण, प्रभू, सोनार इत्यादी वर्ग, त्या वर्गातील व्यक्ती" असा दिलेला आहे. हा पांढरपेशा वर्ग 'अंगमेहनतीची कामे न करणारा' वर्ग आहे हे मुद्दाम लक्षात घ्यायचं. त्यामुळेच आपल्या परीटघडीच्या कपड्यांना धूळ लागू न देणारा वर्ग असंही या पांढरपेशा वर्गाचं वर्णन केलं जातं. म्हणूनच की काय इंग्रजीत 'पांढरपेशा' साठी 'White collar' असा शब्दप्रयोग आहे. अर्थातच हा शब्दप्रयोग कामगार म्हणजे 'Worker' च्या किंवा 'Labour ( Labourer) च्या विरूद्ध अर्थाचा म्हणून वापरला जातो. कारखान्यात किंवा फॅक्टरीमध्ये काम करणाऱ्या कामगारांचा साधारणतः निळा गणवेश असतो. त्यावरून इंग्रजीत कामगारांसाठी 'Blue collar' असा शब्दप्रयोग केला जातो.

भाषेमध्ये जीवनव्यवहारातून असे नवेनवे शब्द तयार होत असतात. हे शब्द नीट समजून घेणं म्हणजे जीवनव्यवहारच समजून घेणं नव्हे काय!



**डॉ. द. दि. पुंडे**

# बोधप्रश्नोत्तरी

(**परमपूज्य** श्री. मंगेशदादा फडके हे कॅलिफोर्निया येथे वास्तव्यास असून प.पू. श्रीकृष्ण दत्तात्रय देशमुख उपाख्य प. पू. डॉक्टरकाका यांचे कृपांकित शिष्य आहेत व त्यांच्याच कृपेने आज स्वतः सद्गुरुपदी विराजमान आहेत. सद्गुरूंच्या कार्यासाठी आपल्या यशस्वी व्यावसायिक कारकीर्दीतून निवृत्ती घेऊन अनेक पारमार्थिक कार्यक्रमाचे आयोजन, विविध आध्यात्मिक विषयांवरील निरूपणे व प्रवचनांच्या माध्यमातून ते सातत्याने प्रबोधन करीत असतात. त्यांच्या निरूपणाचा लाभ अध्यात्मपीठावरील श्रोते घेतच असतात; पण त्यांच्या या अध्यात्मविषयक सदरातून आपल्या अनेक प्रश्नांचेही निरसन होईल अशी आमची खात्री आहे - संपादक)

**भाग १**

मागील अंकात पाच भागांची चिंतनमालिका - ‘सुख नव्हे सुखरूपता’ याची सांगता झाली. या चिंतनमालिकेच्या माध्यमातून परमार्थासंबंधी खालील मूलभूत प्रश्नांचा, शास्त्र व संतवचनांच्या आधारे आपण प्रामुख्याने विचार केला -

परमार्थ म्हणजे काय आणि तो कशासाठी करायचा? अज्ञानाचे म्हणजे नेमके काय ? सुखप्राप्तीची प्रक्रिया काय आहे व त्यासाठी विषयप्राप्ती आवश्यक आहे का ? सुख आणि सुखरूपता (आनंद) यात नेमका फरक काय आहे? निद्रेचे महत्व, त्यातून प्राप्त होणाऱ्या सुखाची नेमकी प्रक्रिया आणि निद्रा व समाधी यातील फरक काय ? जागृतीत विषय नसतांनाही आनंदाची प्राप्ती शक्य आहे का आणि या आनंदाकरिता किंवा समाधिसुखाकरिता काय करावे ?

आधीच्या चिंतनमालिकेप्रमाणे, पुढील काही लेखांमध्ये शास्त्रप्रणित म्हणजे वेदान्तशास्त्राच्या आधारे व संतप्रणित म्हणजे संतांच्या उपदेशाच्या आधारे परमार्थाविषयी मूलभूत संकल्पना आपण समजून घेणार आहोत, ज्यायोगे आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्यास मदत होईल. प्रश्नांच्या माध्यमातून उत्तरे मिळविण्याची ही पद्धत अनेकांना भावल्याने, पुढील चिंतनमालिकेसाठी याच पद्धतीचा अवलंब करावा असे वाटले.

या अंकापासून ‘बोधप्रश्नोत्तरी’ या लेखमालिकेचा शुभारंभ करीत आहोत! साधकाच्या प्रामाणिक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची ईश्वरीय व्यवस्था असते. ईशकृपेचे ते एक स्वरूप आहे. ‘रचना’ संकल्पित ही लेखमालिका त्याचाच एक भाग आहे अशी आमची प्रामाणिक श्रद्धा आहे.

**प्रश्न : मानवी जीवन आणि अध्यात्म याचा नेमका संबंध काय ?**

अध्यात्मशास्त्राचा एकमेव हेतू आहे - सुखरूप (अद्वैतानंद) होऊन, सुखाने (आनंदाने) जगणे व शेवटी त्याच आनंदात हे शरीर व जग सोडून देणे! या सुखरूप जीवनाची उभारणी धर्माच्या पायावर करावी लागते. धर्मजीवनाने माणसाचे मन शुद्ध व शांत होते. त्याचप्रमाणे धर्मजीवन व्यष्टी (व्यक्ती) बरोबर समष्टीचा (समाज) सुद्धा विचार करते.

व्यष्टी, समष्टी, सृष्टी व परमेष्टी या सर्वांच्या संतुलित जीवनाला धर्मजीवन म्हणतात. म्हणूनच आपल्या, आर्य सनातन वैदिक हिंदू धर्माने मानवी जीवनाची उभारणी करताना जे चार पुरुषार्थ सांगितले त्याची सुरुवात धर्माने केली व शेवटी त्याला मोक्षाने बंदिस्त केले - धर्म, अर्थ, काम व मोक्ष. परमार्थ व मानवी जीवन यांचे हेतू परस्परपूरक (complimentary) असून मानवी जीवनाच्या साफल्यासाठी अध्यात्मशास्त्राचा उपयोग आहे. अध्यात्मशास्त्राची प्रयोगशाळा म्हणजे मानवी जीवन व मानवी जीवनाच्या अंतिम ध्येयप्राप्तीसाठी अध्यात्मशास्त्र!

मानवी जन्माच्या या उदात्त व उन्नत ध्येयाची पुसटशी कल्पना नसलेल्या अज्ञानी किंवा नास्तिक लोकांची परमार्थाबद्दल खालील मते असतात.

१) केवळ बुद्धिमान, सुखवस्तू व ऐतखाऊ मंडळींचा कल्पनाविलास

२) दरिद्री, निराश व अपयशी लोकांनी आशाळभूतपणे पत्करलेली जीवनपद्धती (विशेषतः प्रारब्धशास्त्र)

३) कर्तृत्वशून्य, महत्वाकांक्षारहित व जिद्द नसलेल्यांची पळवाट

४) जीवनाच्या शेवटी करण्यासारखे काही न उरल्यानंतर वयोवृद्धांनी करावयाचा एक उद्योग

५) परंपरेने चालत आलेल्या काही गोष्टी, विचाररहित पद्धतीने करण्याच्या गोष्टी इत्यादी.

अध्यात्मशास्त्राचा पुसटसाही अभ्यास नसलेल्यांची ही शेरेबाजी होय. याच्या उत्तरार्थ एकच उदाहरण पुरेसे आहे, तेही अगदी वेदकाळापासूनचे - मुंडक उपनिषदातील प्रश्नकर्ता शौनक (शुनकांचा पुत्र) हा 'महाशाली' म्हणजे महागृहस्थ असा आहे. एका संपन्न कुटुंबाचा तो प्रमुख आहे. दारिद्र्य, निराशा व अपयश याचा त्याला स्पर्शही नाही. असा शौनक आपले श्रीगुरु
(अंगिरा) यांना उपनिषदाच्या सुरुवातीलाच विधिवत् परंतु थेट प्रश्न विचारतो - "कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवतीति।। मु. उप. १.३।।”
अर्थ - असे कोणते तत्त्व, अशी कोणती वस्तू आहे जिचे ज्ञान झाल्यावर सर्व विज्ञेय ('हा', 'ही', 'हे' अशा प्रकारे जाणले जाणारे सर्व काही) जाणल्यासारखे होते ?
परमार्थशास्त्राचा किमान संस्कार असल्याशिवाय या प्रश्नाचा पूर्ण आवाकासुद्धा लक्षात येणे कठीण आहे. प्राचीन ऋषी असो, भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य असो, श्रीज्ञानेश्वर महाराज असो, की सांप्रत काळातले स्वामी विवेकानंद असो; यातील कोणत्या महापुरुषाला वरील विचाररहित विशेषणे लागू पडतात याचा विचार व्हावा.
।। जय जय रघुवीर समर्थ ।।



**प.पू. श्री. मंगेशदादा फडके**

# तन- मनाचा भोवरा

## अटेंन्शन डेफिसीट हायपर ॲक्टिव्हिटी डिसऑर्डर
## (Attention Deficit Hyperactivity Disorder)

**मीरा** सोसायटीत शिरली. अंगणात घोळका दिसत होता. तावातावाने बोलण्याचा आवाज येत होता. तिच्या चालण्याचा वेग वाढला. ती घोळक्यात शिरली. क्रिकेटमध्ये चिटींग केली, यासाठी वादावादी चालू होती म्हणजे अमोघने काही केले नाही तर! तिने दीर्घ सुस्कारा टाकला आणि घराकडे वळली. घराला भलेमोठे कुलूप. म्हणजे कुमार अमोघला घेऊन बाहेर गेला होता. तिला जरा हायसे वाटले. तिने आत येताच सोफ्यावर अंग टाकले आणि उजव्या हाताची मूठ कपाळावर आपटू लागली.

आज तिच्या नोकरीचा शेवटचा दिवस होता. मनाविरूध्द, असहाय्यपणे, परीस्थितीला शरण जाऊन, तिला नोकरी सोडावी लागली होती. कुमार तिचा लाईफ पार्टनर. दोघेही नोकरी करणारे सगळे मॅनेज करणे हळूहळू अवघड होत चालले. आधी कुमारचे आई-बाबा, मग मीराचे आई-बाबा, मग गावाकडचे, दूरचे नातेवाईक हर एक पर्याय वापरून पाहिल्यानंतर शेवटी नाईलाजाने मीराने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला. मोठ्या कष्टाने घेतलेले शिक्षण आणि त्यानंतर धडपड करून मिळवलेली नोकरी सोडणे 'तिच्यासाठी सोपी गोष्ट नव्हती. पण आपल्या गोड बाळासाठी, अमोघसाठी तिने हा निर्णय घेतला होता. अमोघ झाला तसा वर्ष-दोन वर्ष नुसता कौतुकाचा 'वर्षाव सगळीकडून होत होता आणि त्या कौतुकाने मीरा आणि कुमारला मूठभर मांस चढायचे. 'किती गोड आहे ना! शांत बाळ आहे, गुणी बाळ. सगळं समजत बाळाला इत्यादी इत्यादी' पण ह्या कौतुकाची जागा तिरस्काराने कधी घेतली कळलेच नाही.

मीरा अस्वस्थपणे उठली, ग्लासभर थंड पाणी पिऊन परत सोफ्यावर पसरली. डावा हात डोळ्यावर ठेवून शांत डुलकी घेण्याचा प्रयत्न करू लागली. अचानक बंद डोळ्यासमोरून विविध चेहरे फिरू लागले. रागीट, तिरस्कारयुक्त, तक्रारवजा वाग्बाण तिच्या मनाला छेद देऊ लागले यात शाळेतले शिक्षक, सोसायटीतील शेजारी नातेवाईक सर्वांचा समावेश होता.


"सगळा गृहपाठ अपूर्ण असतो याचा."

"वर्गातली गणिते, सराव सगळ्यांवर रेघोट्या"

"स्पेलिंग्ज अजिबात येत नाहीत."

"पी.टी च्या तासाला शिस्तीत खेळत नाही. सतत दुसऱ्याला धक्का दे. आरडा ओरडा कर. अंगावर धावून जा”

“अहो ! अमोघची आई हा शूजसुध्दा बिनालेसचे घालतो."



"सतत या बाकड्यावरून त्या बाकड्यावर जायचे असते याला."

"शाळेत जाताना सोसायटीतील सगळ्या घरांच्या बेल वाजवत जातो."


"स्कूलबसच्या दाराला लोंबकळायचे म्हणून हट्ट करतो."

"दिसेल त्याला वाकुल्या दाखवतो."

"दुपारी अपार्टमेंटमधील वयस्कर मंडळी झोपली असताना दूधवाला, पेपरवाला, ब्रेडवाला ह्यांची नक्कल करत जोरजोराने आवाज काढतो."

"दारांना बाहेरून कड्या लावतो."
मीराने बाजूची पिलो उचलून कानावर गच्च दाबून धरली. आता तर उपदेश आणि सल्ला ह्यांनी तिच्याभोवती फेर धरला. ‘पालकांनी मुलांना द्यायचा क्वालिटी टाईम’, ‘शिस्त आणि संस्कार कसे मुलांच्या अंगी भिनवावेत!’ ‘मुलांना शारीरिक व्यायाम कसा आवश्यक’, 'मुले ही फुले' असतात, त्यांना कसे जपावे’... आणि बरेच काही.
मीरा ताडकन उठून बसली. कालच तिने तिच्या फुलासारख्या अमोघला खूप मारले होते. अगदी हातातल्या चिमट्याने मारले, ती ओक्साबोक्शी रडू लागली.
एकदा मीरा आणि कुमार दिवसभर थकून- भागून घरी आले तर, वॉचमनने अमोघला पकडून आणले होते. कारण असे, की मधमाश्यांच्या पोळ्यातला मध काढायचा आहे म्हणून हा सरसर अशोकाच्या झाडावर चढला. मोठ्या शर्थीने त्याला खाली आणले.
रोजच्या तक्रारी, वहीवरील लाल रेघा, जीवघेण्या करामती यामुळे मीरा आणि कुमार त्रस्त झाले होते. आजूबाजूच्या लोकांची वागणूक बदलत चालली होती. अमोघ गोंधळ करतो म्हणून कोणी वाढदिवसाला, समारंभाला त्याला बोलवेनासे झाले. बिल्डिंगमध्ये खाली खेळताना त्याला घेण्याचे टाळले जाऊ लागले. शाळेत बेंचवर कोणी सोबत करेना. त्याला सोडून डबा खाल्ला जाऊ लागला.

पाचवीतल्या अमोघची ही स्थिती, तर ‘पुढे काय होणार आपल्या मुलाचे? ह्या विचाराने मीरा आणि कुमार त्रस्त झाले होते.
उद्या सेमिस्टरची तिसरी पालकसभा होती.आधीच्या दोन सभांना पालक या नात्याने भरपूर ऐकून घ्यावे लागले होते. थोडी मनाची तयारी करायला हवी म्हणत मीरा देवाला सांजवात लावायला उठली.
दुसऱ्या दिवशी जीव मुठीत घेऊनच मीरा आणि कुमार शाळेत पोचले. नवीन रूजू झालेल्या प्रिन्सिपल पोतदारबाई आज त्यांच्याशी संवाद साधणार होत्या. क्लासटीचरने हेडबाईंना अमोघचे रिपोर्ट सांगितले होते. बाईंनी अमोघला जवळ बसवून घेतले व स्वतःच्या पर्समधली शंभर रू.ची नोट काढली आणि अमोघला विचारले. "अमोघ, हे काय आहे रे?'
'शंभर रू.ची नोट
हा फोटो कोणाचा रे?"
"गांधीजीचा"
"ह्यांचा फोटो नोटेवर कशासाठी छापला आहे?”
अमोघ म्हणाला "ते भारतासाठी फुटबॉल, वर्ल्डकप खेळतात यासाठी."
बाई म्हणाल्या, “उद्या ह्याच प्रश्नाचे उत्तर नीट विचार करून सांग बरं बाळ.”
आणि त्यांनी अमोघला बाहेर बसायला सांगितले.



पोतदार बाईंनी सगळ्या शिक्षकांकडे कटाक्ष टाकला. त्यांना उद्देशून त्या म्हणाल्या, “मलेरियाने फणफणलेल्या रुग्णाला, ताप का आला?' असा जाब विचारल्यासारखे करता तुम्ही. अमोघच्या हालचाली बघता प्रथमदर्शनी त्याला ADHD असल्याची लक्षणे दिसत आहेत.”
अमोघला मानसोपचार तज्ञाला दाखवावे, असा सल्ला त्यांनी दिला. कुठेतरी दुखऱ्या मनामध्ये आशेचा किरण लुकलुकला.

त्याच दिवशी संध्याकाळी मीरा, कुमार डॉक्टरकडे गेले. अमोघ अपेक्षेप्रमाणे डॉक्टरजवळच्या स्टूलवर बसलाच नाही. डॉक्टरांच्या गळ्यातला स्टेथो काढू लागला. पेनने डॉक्टरांच्या हातावर बदक काढतो, म्हणून मागे लागला. त्याच्या वागण्याने मीरा कुमार खजील झाले. पण डॉक्टरांनी तेवढ्याच उत्साहाने आपला हात पुढे केला आणि दहा मि. नंतर त्याला “टीव्ही पाहा” म्हणून बाहेर पाठवले.
मीरा आणि कुमार दोघांनी सारा वृत्तान्त सविस्तर सांगितला. मीराला रडू आवरेना 'अमोघला कधी कधी संतापात इतके मारले आहे, की आता वाटते मार्ग काढू कसा यातून ?'
डॉक्टर म्हणाले "आपले बोलणे वागणे, उठणे, बसणे, वावरणे, समाजात वावरताना भान बाळगणे. अगदी साध्या साध्या गोष्टींचा विचार करणे साऱ्या प्रक्रियांना मेंदू एक दिशा देतो. पण बऱ्याचदा या दिशा दर्शनात काही सिग्नल्स चुकतात. जिथे आपण थांबायला हवे. वाट पाहायला हवी. तिथे मेंदू लाल सिग्नल देतो. पण कधी कधी या मेंदूकडून लाल सिग्नल पडतच नाही. सतत ग्रीन सिग्नल चालू असल्याने गाडी सुसाट पळते. आणि आपल्याला अमोघचे बेशिस्त वागणे दिसते. साधारणपणे शाळेत जाणाऱ्या कमीत कमी दहा टक्के मुलांमधे हा आजार दिसतो. याला आपण पालक, शिक्षक मंडळी. व्रात्य, खोडकर, बेशिस्त असा ठसा मारून वर्गाबाहेर काढतो. सतत कोवळ्या मनावर ओरखडे पडणारे शब्द वापरणे असे प्रकार करतो"
लिऑन आईसेन बर्ग नावाच्या मानसोपचार तज्ञाने ह्या आजारावर सखोल संशोधन केले आणि यावर खात्रीचे उपचार आहेत असे निक्षून सांगितले. बरीचशी औषधे विकसित झाली. "तू शिस्तीने वाग, धरसोड करू नकोस, गोंधळ करू नकोस.” म्हणून शिस्तीची संयमाची अपेक्षा करणे म्हणजे आडात नाही तर पोहऱ्यात कुठून येणार?" अशी गत झाली. डॉक्टरांनी अमोघचे वजन पाहिले आणि गोळ्या दिल्या. ही गोळी दररोज सकाळी शाळेत जाण्याअगोदर घ्यायची असे सांगितले. अमोघ डॉक्टरांकडे पुढचे चार सहा महिने नियमित तपासणीस गेला. अमोघमध्ये जणू जादूची छडी फिरवल्यासारखा बदल झाला. ‘फूटबॉल खेळणारे गांधीजी’ म्हणणारा हा अमोघ एका संध्याकाळी कुमार घरी परतला

आणि बघतो तर काय ? अमोघ शांत बसून 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' यांच्यावर दहा ओळी लिहा ह्या प्रश्नांचे उत्तर लिहून संपवत होता.



रश्मी वडवळकर

खवय्येगिरी

## कॉर्न चाट रेसिपी



**साहित्य** :

एक कप स्वीट कॉर्न
एक मोठा चमचा बटर
अर्धी वाटी प्रत्येकी, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि सिमला मिरची
एक छोटा चमचा तिखट, मीठ, काळे मीठ, आणि चाट मसाला
पाव वाटी बारीक शेव

**कृती** :

स्वीट कॉर्न उकडून घ्यायचे. त्यातील पाणी पूर्णपणे काढून टाकायचे. गरम असतानाच त्यात बटर, बारीक चिरलेला
कांदा, टोमॅटो, सिमला मिरची, तिखट, मीठ, काळे मीठ आणि चाट मसाला घालायचा. सगळे नीट एकत्र करायचे.
खाताना आवडीप्रमाणे बारीक शेव घालायची.



**मिताली खासबाग**

# शब्दकोडे उत्तर

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ वि | चा | २ र | वं | ३ त | | ४ नि | व | ५ ड | णू | ६ क |
| ष | | वा | | ल | | य | | ब | | पि |
| ७ म | वा | ळ | | ८ म | ९ ल | म | | १० र | म | ल |
| भा | | | | | क | | | | | दे |
| ११ व | ऱ्हा | १२ ड | | १३ ज | ब | १४ र | | १५ आ | जी | व |
| | | १६ म | न | न | | १७ पे | श | वा | | |
| १८ वा | स | रू | | १९ ता | २० प | ट | | २१ र | का | २२ ना |
| जं | | | | | री | | | | | ते |
| २३ त्रि | द | २४ ल | | २५ बा | स | २६ न | | २७ व | ण | वा |
| वा | | के | | व | | गा | | ल | | ई |
| २८ ले | कु | र | वा | ळा | | २९ रा | सा | य | नि | क |


FIVE DIMENSIONS
ENTERTAINMENT
भेट तुमच्या घरातूनं
CHICAGO
21 MARCH 2026




महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
पुरी
बटाटा भाजी
पनीर भाजी
मसाले भात
श्रीखंड
कढी
लिलवा कचोरी
फ्रायम्स
कैरी पन्हे
मुखवास
प्रसाद
आंबे डाळ
गुढीपाडव्याच्या स्वादिष्ट जेवणाचा आस्वाद घ्यायला कार्यक्रमाला नक्की या!

# गुढीपाडवा २०२६ कार्यक्रमातील VOLUNTEERS

दिपाली सावंत
श्वेता हरणखेडकर
अपर्णा खळदकर
पल्लवी पाटील
शिल्पा संत
रश्मी चाफेकर
नरसिम्हा कामत
नवीन शेणॉय
निलेश मालपेकर
राजेश हटकर
उषा शेडगे
वीर दोशी
योगिता निकम
नेताजी निकम

चेतन रेगे
काबोरी पाटील
मिलिंद पाटील
आरती खोत
अनिष खोत
राज खोत
प्रशांत हेडाऊ
मिनाक्षी हेडाऊ
रुचिरा करंदीकर
शलाका सावंत
नम्रता पुरव
श्रुती कुळकर्णी
स्वाती आपटे
हृषिकेश घोडके
रत्नांगी मालपेकर

आशिष नगरकर
प्रियेश देशपांडे
मोनिका पाटणकर
ब्रिजेन सावंत
अनिकेत सावंत
सुजित कुळकर्णी
अनघा देऊळकर
प्रीती उंडाळे
अलका गाडगीळ
सोनाल देशपांडे
मुक्ता मनोहर
उल्का नगरकर
मंदार पंडित
सौमिल पंडित
मनिषा पंडित

# गुढीपाडवा २०२६ कार्यक्रमातील क्षणचित्रे












## भजन सेवा - एप्रिल २६



## फॉरेवर यंग टीमने 'राजा शिवाजी' चित्रपटाचा आनंद घेतला.





महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या - शिकागो मराठी शाळेच्या -
नेपरविल, शॉम्बर्ग व बफेलो ग्रोव्ह अशा तिन्ही शाखांच्या
शिक्षकांचा व स्वयंसेवकांचा चमू













**महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या -
शिकागो मराठी शाळेचा अमेरिकेतील सर्व
मराठी शाळांमध्ये प्रथम क्रमांक!**

**बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या मराठी शाळांच्या
वार्षिक परीक्षांकरिता शिकागोमध्ये
सर्वाधिक नोंदणी!**

# MMC झूम कट्टे व त्यांचे आयोजक

**MMC साहित्यकट्टा**



दिपाली सावंत(EC)



माधव गोगावले



श्रद्धा भट



मंजुषा पांडे



अश्विनी कुंटे

## MMC अध्यात्मपीठ



सुजित कुळकर्णी(EC)



उर्मिला दामले



रेखा देवधर



माधव गोगावले



शिल्पा देशपांडे



हर्षा थत्ते




दिपाली सावंत

## MMC आम्ही सारे गवय्ये




आशिष नगरकर (EC)



रश्मी चाफेकर




मनीषा प्रभू



अनिरुद्ध भिडे




मीनाक्षी हेडाऊ



हेमा साखरदांडे



देवेन्द्र औटी



दिपाली सावंत

MMC इतिहासमंच




चेतन रेगे



ब्रिजेन सावंत



माधव गोगावले



अश्विनी कुंटे




अनिकेत सावंत



दिपाली सावंत

## MMC YOUTH



मोनिका पाटणकर



श्वेता हरणखेडकर



शीतल देशपांडे



रत्नांगी मालपेकर



दिपाली सावंत

MMC पूर्णब्रह्म



पल्लवी पाटील



शीतल देशपांडे



शिल्पा संत



दिपाली सावंत

## MMC योगसाधना



दिपाली सावंत



विशाल नवलकर



उर्मिला दामले

MMC भ्रमणगाथा



अनघा देऊळकर



वैशाली बेलसरे



रत्नांगी मालपेकर



कविता कुलकर्णी



दिपाली सावंत

## MMC अर्थविचार



ब्रिजेन सावंत



मंदार जोगळेकर



चैतन्य आगाशे



चेतन रेगे



दिपाली सावंत

## MMC आरोग्यधाम



दिपाली सावंत



उल्का नगरकर



पल्लवी बेटसूर



नमीता वेदक

## MMC आरास



मनीषा पंडित



शलाका सावंत



काबोरी पाटील



हृषिकेश घोडके



दिपाली सावंत

## MMC धिनक धिन धा



प्रीती उंडाळे



सिद्धी सावंत



दिपाली सावंत

## MMC परंपरा




अनघा देऊळकर



मनीषा पंडित



माधुरी पऱ्हाड



राधिका देसाई



दिपाली सावंत

## MMC फिटनेस क्लब



ब्रिजेन सावंत



विशाल नवलकर



दिपाली सावंत

## MMC फॉरेव्हर यंग



दिपाली सावंत



माधव गोगावले



कश्मिरा मगर



ज्योती गोगावले


**MMC शिकागोची बाग**



दिपाली सावंत



श्वेता हरणखेडकर



भास्कर शेडगे



कविता वाडकर

## MMC ढोलताशा



ऋषिकेश घोडके



सदानंद जोशी



चैतन्य आगाशे



दिपाली सावंत

## MMC भजनसेवा



मनीषा पंडित



नयना शेलार



मंगला गडकरी



मुक्ता मनोहर




जयश्री यादव



दिपाली सावंत


# MMC झूम कट्ट्यांच्या कार्यक्रमपत्रिका











महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
**अध्यात्मपीठ**
गुरुवार दिनांक ९ एप्रिल २०२६
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
भारतीय वेळ शुक्रवार सकाळी ६:३०
राम भक्त श्री हनुमान
वक्ते: श्री.ना.भा.दातार
• शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, सुजीत कुलकर्णी, दीपा सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
**अध्यात्मपीठ**
गुरुवार दिनांक २ एप्रिल २०२६
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
हनुमान जयंती निमित्त
भजन
व स्तोत्र पठण
संध्या
• शांतिमंत्र
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, सुजीत कुलकर्णी, दीपा सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
**अध्यात्मपीठ**
गुरुवार ७ मे २०२६
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
गणपती अथर्वशीर्ष
निरूपण भाग ३९
निरूपणकार
प. पू. मंगेशदादा फडके
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थत्ते, सुजीत कुलकर्णी, दीपा सावंत



महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
'साहित्यकट्टा' तर्फे 'बोलका कट्टा' या कार्यक्रमात सादर करत आहे,
हर्षदा सुंठणकर
गुंजन पाटील
अंजली ढमाळ
वैशाली पतंगे
समीर जिरांकलगीकर
माधव गोगावले
श्रध्दा भट
मराठी भाषा गौरव दिनानिमित्त
आंतरराष्ट्रीय कवी संमेलन
बुधवार, २५ फेब्रुवारी २०२६. संध्याकाळी ८.०० वाजता (शिकागो वेळेनुसार)
गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६. सकाळी ७.३० वाजता (भारतीय वेळेनुसार)
साहित्यकट्टा आयोजक : दिपाली सावंत, माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
भ्रमणगाथा सादर करीत आहे
¡Hola Amigos! Bienvenidos a
Colombia
Presented by:
Anushka & Shivani Dewoolkar
Bilingual presentation (English & Spanish)
We welcome participants from all age groups!
Date: Feb 24 2026
Time: 8:00 PM (Central Time)
Where: Zoom (link and password will be provided)


महाराष्ट्र मंडळ शिकागो - २०२६
भारताचं हृदय म्हणजे मध्य प्रदेश !!!
तिथल्या सुंदर प्रदेशाची, निसर्गाची व इतिहासाची सफर घडवतेय -
कविता कुलकर्णी !!
केव्हा ? - मंगळवार २८-एप्रिल
किती वाजता ? - रात्री ८ वाजता
मीटिंग लिंक - https://us06web.zoom.us/j/89453283987?pwd=QkI4UVFnTzdiQVNpbzlTNzB2NGRyZz09
ग्रुप डिस्क्रिप्शन मध्ये आहे
मीटिंग नंबर - 894 5328 3987
पासकोड - bhraman


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
भ्रमणगाथा सादर करीत आहे
Young Explorer's Adventure share
Presented by:
1. Atharv K Hattalli
2. Aarush K Hattalli
3. Advait Deshpande
4. Savni Nagarkar
5. Saloni Nagarkar
Date: March 31st 2026
Time: 8:00 PM (Central Time)
Where: Zoom (link and password will be provided)
Join us as they are excited to share their amazing travel experiences and adventures.


संकल्पना - मार्च
श्रीराम जय राम जय जय राम !!!
भजनांची यादी द्या
तुमचे नाव नोंदवणी करा
व्यक्तिश: उपस्थित रहा
तारीख- २९ मार्च
वेळ - सकाळी ११:०० ते १२:३०
Hosting: मनिषा आणि मंदार पंडीत
स्थळ: 1398 Haversham drive, Aurora, 60502
श्रीराम भजन सेवा
॥ जय श्री राम ॥
अमृताहुनी गोड नाम मकरंद,
रामनामी रंगलासे नामभक्तवृंद !!


एप्रिल - संकल्पना
ज्याच्या हृदयात फक्त सीता राम अशा बजरंग बलीला कोटी कोटी प्रणाम !!!
तुमचे नाव नोंदवणी करा
भजनांची यादी द्या
तारीख- २५ एप्रिल
व्यक्तिशः उपस्थित रहा
वेळ - ४:०० ते ६:०० pm cst
Hosting: उर्मिला आणि अनिरुद्ध दामले
स्थळ: 766 Bonaventure drive Oswego 60543
पवन पुत्र हनुमान भजन सेवा
सृष्टी रचणारा, तो भगवंत,
आणि संकट हरणारा, तो हनुमंत !!!


MAHARASHTRA MANDAL CHICAGO
FOREEVER YOUNG TEAM
★ MOVIE NIGHT ★
राजा शिवाजी
हिंदी WITH ENGLISH SUBTITLES
COME JOIN US FOR AN EPIC STORY OF COURAGE, HONOR & LEGACY!
GREAT MOVIE
FAMILY & FRIENDS TIME
MEMORIES TO CHERISH
RAJA SHIVAJI
SENIOR SPECIAL TICKET PRICES
1 MAY 2026
SATURDAY, MAY 02, 2026 | 3.00 PM
CINEMARK SEVEN BRIDGES
6500 ROUTE 53, WOODRIDGE, IL 60517
CINEMARK SEVEN BRIDGES
LET'S CELEBRATE OUR HERITAGE TOGETHER!
See you there!


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६
पुरी
बटाटा भाजी
पनीर भाजी
मसाले भात
श्रीखंड
कढी
लिलवा कचोरी
फ्रायम्स
कैरी पन्हे
मुखवास
प्रसाद
आंबे डाळ
गुढीपाडव्याच्या स्वादिष्ट
जेवणाचा आस्वाद
घ्यायला कार्यक्रमाला
नक्की या!



महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे: ३ भागांची व्याख्यानमाला
Itihas Manch Session # 163
ताजमहाल – भाग १
"ताजमहालावर नवा प्रकाश"
दिनांक व वेळ: शुक्रवार, २ जानेवारी २०२६, रात्री: ८:०० – १०:०० CT
विंग कमांडर शशिकांत ओक
आयोजन: चेतन रेगे, माधव गोगावले, व्रिजेन सावंत, अश्विनी कुंदे, अनिकेत सावंत, आणि दीपाली सावंत


महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे: ३ भागांची व्याख्यानमाला
Itihas Manch Session # 164
ताजमहाल – भाग २
"ताजमहाल हे शिवमंदिर नव्हे !"
दिनांक व वेळ: शुक्रवार, ९ जानेवारी २०२६, रात्री: ८:०० – १०:०० CT
विंग कमांडर शशिकांत ओक
आयोजन: चेतन रेगे, माधव गोगावले, व्रिजेन सावंत, अश्विनी कुंदे, अनिकेत सावंत, आणि दीपाली सावंत

## महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२६

**'साहित्यकट्टा' व 'आरोग्य धाम' यांच्या संयुक्त विद्यमाने**

**'बोलका कट्टा' सादर करत आहे**



### विषय: नाडी ग्रंथ आणि भविष्य कथनाचे किस्से




**व्याख्याते: विंग कंमाडर शशिकांत ओक**

बुधवार २२ एप्रिल २०२६, रात्री ८.०० वाजता शिकागो वेळेनुसार .

गुरुवार २३ एप्रिल २०२६, सकाळी ६.३० वाजता भारतीय वेळेनुसार .

**आयोजक : माधव गोगावले, श्रध्दा भट, अश्विनी कुंटे, मंजुषा पांडे, उल्का नगरकर, पल्लवी बेटसुर, दिपाली सावंत**


— ARTHA VICHAR SESSION 2026 —
WEALTH
BEGINS WITHIN
Financial Wisdom for Smarter Living
A reflective.session on the emotions, beliefs, and inner patterns that shape our relationship with money, security, and abundance.
Because real wealth starts in the mind
APRIL 26 SUN
TIME 7 PM—9PM
WHAT YOU'LL GAIN
Understand your money mindset. and pattems
Build a healthy relationship with money
Align beliefs with abundance and purpose
Create clarity, confidence financial freedom
SPEAKER
Himanshu Deshmukh
ICF-Certified Life Coach, NLP-Trainer & Sports Psychologist
Helping Individuals shift from stress to abundance by transforming their mindset around money, success, and life.
THINK DEEPER. FEEL CLEARER. LIVE WEALTHIER
Join us for an insightful journey within, that creates wealth for a lifetime.


Maharashtra Mandal Chicago
Graduation Ceremony
30th May 2026 at sharp 8:30 AM CST
Breakfast - 8:30 - 9:00 AM CST
Graduation Ceremony Sharp 9:00 AM CST onwards
High school, College, and Masters
We are looking forward to celebrate with you,
your milestone achievement...!!!
May your cap fly as high as
your dreams
Point of Contact:
Deepa Sawant
+1 (630) 776-3485
Monica Patankar
+1 (630) 747-9923
Terms Apply: MMC Membership Mandatory

# धन्यवाद